दैनिक
हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
Web portal : hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

श्री साईचरणी 4 लाख 53 हजार रुपये किमतीची सोन्याची राखी व फूल अर्पण

शिर्डी (प्रतिनिधी) : साईबाबांवरील अढळ श्रद्धा आणि भक्तिभावातून देश-विदेशातील साईभक्त साईबाबांच्या चरणी विविध मौल्यवान वस्तू व देणग्या अर्पण करीत असतात. याच भक्तिभावातून तेलंगणा राज्यातील हैदराबाद येथील साईभक्त विरण साई गट्टा यांनी शुक्रवारी साईबाबांच्या चरणी ४० ग्रॅम १८० मिलिग्रॅम वजनाची १ नग सोन्याची राखी व १ नग सोन्याचे फूल अर्पण केले. या दोन्ही वस्तूंचे एकूण देणगी मूल्य रुपये ४ लाख ५३ हजार ४७१ इतके आहे.

महावितरणची राज्यभरात 3 दिवसांत 250 वीजचोरीची प्रकरणे उघड

मुंबई : राज्यात वीजचोरी आणि अनधिकृत वीज वापराविरोधात महावितरणने विशेष मोहीम राबवली आहे. या मोहिमेत अवघ्या 3 दिवसांत वीजचोरीची 250 प्रकरणे उघडकीस आली आहेत. या कारवाईत एकूण 6 कोटी 27 लाख रुपयांच्या वीजचोरीचा पर्दाफाश झाल्याची माहिती महावितरणने दिली आहे. सुरक्षा आणि अंमलबजावणी विभागाच्या भरारी पथकांनी राज्यातील विविध भागांत तपासणी करून ही कारवाई केली.महावितरणच्या सुरक्षा व अंमलबजावणी विभागाने कोकण, पुणे, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या चार प्रादेशिक विभागांत तपासणी केली. त्यामध्ये सर्वाधिक 73 प्रकरणे पुणे विभागात आढळली.

छत्रपती संभाजीनगर ❀ शनिवार, दि. २१ नोव्हेंबर २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : २०७ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com ❀ Postal Regn. No. ABD/551/2026-2028

थोडक्यात वार्ता

योगी आदित्यनाथ यांना मातृशोक; वयाच्या 91 व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास



उत्तर प्रदेश: उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या आई सावित्री देवी यांचे शुक्रवारी उत्तराखंड राज्यातील पौरी गढवाल जिल्ह्यातील त्यांच्या मूळ गावी निधन झाले. पौरी गढवालचे एसएसपी सर्वेश पनवार यांनी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या आईच्या निधनाच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. एसएसपी सर्वेश पनवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, "पौरी गढवाल जिल्ह्यातील पंचूर गावात सावित्री देवी यांचे निधन झाले आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या मातोश्रींवर शनिवारी हरिद्वारमध्ये अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची शक्यता आहे. पोलीस प्रशासन आणि जिल्हा प्रशासन योगी यांच्या कुटुंबियांच्या संपर्कात आहे. त्यांच्यासोबत संवाद साधून सविस्तर माहिती माध्यमांना देण्यात येणार आहे." मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या मातोश्रींचे निधन वयाच्या 91 व्या वर्षी झाले आहे. त्या गेल्या अनेक महिन्यांपासून आजारी होत्या आणि शुक्रवारी त्यांचे निधन झाल्याची माहिती आहे. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी 'एक्स'वर पोस्ट शेअर करत सावित्री देवी श्रद्धांजली वाहिली आहे. आणि योगी आदित्यनाथ यांच्या दुःखामध्ये सामील असल्याची प्रतिक्रिया त्यांनी दिले आहे. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी पोस्ट शेअर करत माहिती दिली की, "उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या मातोश्री सावित्री देवी यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद आणि हृदयद्रावक आहे. आईचे प्रेम, आशीर्वाद आणि माया ही जीवनातील सर्वात मौल्यवान संपत्ती आहे. त्यांच्या निधनामुळे योगी यांच्या कुटुंबीयांमध्ये निर्माण झालेली पोकळी केव्हाही भरून न निघणारी आहे. मी बाबा केदार यांच्याकडे प्रार्थना करतो की, त्यांच्या आत्म्याला त्यांच्या पवित्र चरणी स्थान द्यावे. योगी आदित्यनाथ आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्हीही सहभागी आहोत."

विश्वास नांगरे पाटील यांच्या नावाचा गैरवापर; महिला डॉक्टरची फसवणूक

पुणे : सायबर गुन्हेगारांकडून नागरिकांची फसवणूक करण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतींचा वापर केला जात आहे. आता वरिष्ठ आयपीएस अधिकारी विश्वास नांगरे पाटील यांच्या नावाचा गैरवापर करून पुण्यातील एका महिला डॉक्टरची 3 लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. मनी लॉंड्रिंग आणि दहशतवादी कारवायांसाठी निधी पुरवल्याच्या गुन्ह्यात अडकवण्याची भीती दाखवून आरोपींनी डॉक्टरकडून पैसे उकळल्याचा आरोप आहे. 22 ते 27 ऑक्टोबरदरम्यान हा प्रकार घडल्याचे तक्रारीत नमूद आहे. याप्रकरणी 43 वर्षीय महिला डॉक्टरने पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. सुरुवातीला पुणे सायबर पोलीस ठाण्यात नोंद झालेला हा गुन्हा पुढील तपासासाठी सिंहगड रोड पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ऑक्टोबर महिन्यात महिला डॉक्टरला एका अनोळखी क्रमांकावरून फोन आला. फोन करणाऱ्या व्यक्तीने आपण सायबर सेल ऑफ इंडियातून बोलत असून विश्वास नांगरे पाटील यांचा सहाय्यक असल्याचे सांगितले. त्यानंतर दुसऱ्या एका व्यक्तीने फोन करून आपण मुंबई क्राईम ब्रँचचा वरिष्ठ अधिकारी असल्याचे भासवले. या व्यक्तींनी डॉक्टरचे आधार कार्ड एका संशयास्पद मोबाईल क्रमांकाशी जोडले असल्याचा दावा केला. तसेच अश्लील संदेश पाठवून पैसे कमावल्याचा आणि मनी लॉंड्रिंग तसेच टेरर फंडिंगच्या प्रकरणात नाव आल्याचा आरोप केला.

माजलगावात पुण्याच्या पोर्शे कार अपघाताची पुनरावृत्ती; भररस्त्यात दोन आलिशान गाड्यांची रेस लागल्याची चर्चा

क्रेटाच्या धडकेत दुचाकीवरील पती -पत्नीचा मृत्यू, श्रीमंतांच्या मुलांचा वेगाचा खेळ ठरतोय सामान्यांच्या जीवावर !

माजलगाव : भररस्त्यावर आलिशान गाड्यांमधून वेगाची स्पर्धा लावण्याच्या चर्चेने माजलगाव शहर परिसरात खळबळ उडाली आहे. कल्याण-निर्मळ राष्ट्रीय महामार्गावर डक पेट्रोल पंपासमोर भरधाव क्रेटा कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने पतीचा जागीच मृत्यू झाला, तर गंभीर जखमी असलेल्या पत्नीला उपचारासाठी संभाजी नगरकडे जाताना वाटेतचनिधन झाले. गुरुवार, दि. २० नोव्हेंबर रोजी दुपारी तीनच्या सुमारास ही दुर्दैवी घटना घडली. या घटनेमुळे पुण्यातील चर्चित पोर्शे अपघाताची आठवण ताजी झाली आहे.

प्रल्हाद श्रीपाद गायकवाड (वय ५५) व सुनीता प्रल्हाद गायकवाड (वय ५०) हे पती पत्नीचा अपघातात मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, गायकवाड दाम्पत्य एका मंगल कार्यालयातील कार्यक्रमासाठी आले होते. कार्यक्रम आटोपल्यानंतर ते डक पेट्रोल पंपावर दुचाकी (क्रमांक MH 20 DQ 6085) मध्ये पेट्रोल भरण्यासाठी गेले होते. पेट्रोल भरून राष्ट्रीय महामार्गावर येत असतानाच भरधाव क्रेटा कार (क्रमांक MH 44 AD 5141) ने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत प्रल्हाद गायकवाड यांचा



जागीच मृत्यू झाला, तर अपघातात गंभीर जखमी असलेल्या सुनीता गायकवाड यांना उपचारासाठी संभाजी नगरकडे जाताना वाटेतच निधन झाले.

दोन गाड्यांमध्ये रेस लागल्याची चर्चा! : या अपघातानंतर संबंधित क्रेटा कार आणि अन्य एका वाहनामध्ये भररस्त्यावर वेगाची स्पर्धा सुरू असल्याची



चर्चा परिसरात रंगली आहे. मात्र, या चर्चेला अद्याप अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. अपघातानंतर क्रेटा कारचालक घटनास्थळावरून फरार झाल्याची माहिती आहे.*

पुण्याच्या पोर्शे प्रकरणाची आठवण! : पुण्यातील पोर्शे अपघातानंतर अल्पवयीन वाहनचालक, पैशांचा माज आणि रस्त्यावरील बेजबाबदार वेगाचा प्रश्न राज्यभर चर्चेत आला होता. आता माजलगावातील या अपघातामुळे पुन्हा एकदा अशाच प्रकारच्या घटनांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. रस्ते हे वाहनांच्या वेगाची स्पर्धामुळे सर्वसामान्यांच्या जीव गमवावा लागत आहे. दुसऱ्यांच्या जीवाची पर्वा न करता वाहन चालविणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

औषध विभागाची कारवाई; 17.73 कोटींचा साठा जप्त, 555 परवाने रद्द

मुंबई : अन्न व औषध प्रशासनाच्या (FDA) औषध विभागाने 1 एप्रिल ते 31 ऑक्टोबर 2026 या सात महिन्यांच्या कालावधीत राज्यभरातील औषध उत्पादक आणि विक्री आस्थापनांची तपासणी करत मोठी नियामक कारवाई केली. या काळात एकूण 7,950 तपासण्या करण्यात आल्या असून, 2,629 नियामक कारवाया करण्यात आल्या आहेत. या मोहिमेत सुमारे 17.73 कोटी रुपये किमतीचा औषधसाठा जप्त करण्यात आला.

555 परवाने रद्द, 2,074 परवाने निलंबित

औषध विक्री आस्थापनांच्या 6,548 तपासण्या करण्यात आल्या. यामध्ये 2,483 नोटिसा बजावण्यात आल्या असून, 450 परवाने रद्द आणि 1,859 परवाने निलंबित करण्यात आले. तसेच औषध उत्पादक आणि इतर आस्थापनांच्या 1,402 तपासण्यांमध्ये 405 नोटिसा



देण्यात आल्या. या कारवाईत 105 परवाने रद्द, तर 215 परवाने निलंबित करण्यात आले. विभागनिहाय आकडेवारीनुसार, कोकण विभागात सर्वाधिक 2,502 तपासण्या करण्यात आल्या. याशिवाय 808 नोटिसा बजावण्यात आल्या असून, 712 नियामक कारवाया करण्यात आल्या.

131 धाडी; 37 गुन्हे दाखल, 19 जणांना अटक

औषध विभागाने या सात महिन्यांत 131 ठिकाणी धाडी टाकल्या. या कारवाईत 17.73 कोटी रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला. विविध प्रकरणांत 37 गुन्हे दाखल करण्यात आले असून, 19 जणांना अटक करण्यात आली.

विभागाने केलेल्या प्रमुख कारवायांमध्ये विनापरवाना औषध उत्पादन आणि विक्रीप्रकरणी 53 धाडी टाकण्यात आल्या. यात 12.73 कोटी रुपयांचा माल जप्त करण्यात आला. या प्रकरणांत 14 गुन्हे दाखल करून 6 जणांना अटक करण्यात आली. बनावट औषधे आणि सौंदर्य प्रसाधनांविरोधात 14 धाडी टाकून 2.19 कोटी रुपयांचा साठा जप्त करण्यात आला.

याप्रकरणी 10 गुन्हे दाखल झाले. वैद्यकीय उपकरणे नियम, 2017 चे उल्लंघन केल्याप्रकरणी 5 धाडींत 84.06 लाख रुपयांचा माल जप्त करण्यात आला. मिथ्याछाप औषधांच्या म्हणजेच लेबलिंगविषयक नियमांचे उल्लंघन केल्याप्रकरणी 3 धाडी टाकून 83.39 लाख रुपयांचा साठा जप्त करण्यात आला. आक्षेपार्ह जाहिरातींविरोधात 31 धाडींत 55.57 लाख रुपयांचा माल जप्त करण्यात आला. तर NDPS कायद्यांतर्गत 10 धाडी टाकून 10 गुन्हे दाखल करण्यात आले असून, 10 जणांना अटक करण्यात आली.

राज्यातील चार वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या

मुंबई: राज्य शासनाने शुक्रवारी (२० नोव्हेंबर) चार वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांच्या (IAS) बदल्यांचे आदेश जारी केले. यामध्ये महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक अशोक काकडे यांच्यासह चार अधिकाऱ्यांकडे नव्या जबाबदाऱ्या सोपवण्यात आल्या आहेत.

कोणाची कुठे बदली? - अशोक वामन काकडे (IAS: 2010): महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळाचे (MAIDC) व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत असलेल्या काकडे यांची मंत्रालयातील दिव्यांग कल्याण विभागाच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

प्रवीण कुंडलिक पुरी (IAS: 2011): उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाचे सदस्य सचिव म्हणून कार्यरत असलेल्या पुरी यांची महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोगाच्या सचिवपदी नियुक्ती झाली आहे.

गुलाब राजाराम खरात (IAS: 2013): यांची महाराष्ट्र राज्य वित्त महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालकपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

मकरंद प्रल्हाद देशमुख (IAS: 2013): मुख्यमंत्री सचिवालयातील मुख्य सचिव कार्यालयात सहसचिव म्हणून कार्यरत असलेल्या देशमुख यांची मुंबईतील राज्य कर विभागाच्या सहआयुक्तपदी बदली करण्यात आली आहे.

सैनिकी शाळांतील प्रवेश आता केवळ गुणवत्तेच्या आधारेच; मुख्यमंत्री फडणवीस यांचे निर्देश

मुंबई : राज्यातील सैनिकी शाळांमध्ये पारदर्शक, उत्तरदायी आणि गुणवत्तापूर्ण व्यवस्था निर्माण करण्यावर नव्या धोरणात भर दिला जावा, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. गुणवत्ताधारित प्रवेश प्रक्रिया अधिक मजबूत करून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शाळांना प्रोत्साहन दिले जाईल, तर कामगिरीत पिछाडीवर असलेल्या शाळांवर आवश्यकतेनुसार कठोर प्रशासकीय कारवाई केली जाईल, असेही त्यांनी नमूद केले. 'वर्षा' निवासस्थानी त्यांच्या अध्यक्षतेखाली राज्य सैनिकी शाळा मूल्यांकन व सक्षमीकरण आराखडा तसेच सुधारीकरण धोरण समितीच्या अहवालासंदर्भात आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीत शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, प्रधान सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक मंगेश जोशी, यशदा, पुणे येथील उपमहासंचालक हेमंत वसेकर, सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटी, नागपूरचे शैलेश जोगळेकर, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे येथील डॉ. अजय फुंदे तसेच समितीचे सदस्य व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, समितीने सादर केलेल्या अहवालातील बहुतांश शिफारशी योग्य असून संबंधित विभागांनी त्यावर आवश्यक कार्यवाही करावी. यासाठी अन्य विभागांशी समन्वय साधून निर्णय घ्यावेत. सैनिकी शाळांच्या कामकाजाचा वर्षातून एकदा आढावा घेऊन शिफारशींच्या अंमलबजावणीची प्रगती तपासावी. 'अ' वर्गातील सैनिकी शाळांना त्यांच्या कामगिरीबाबत प्रोत्साहन देवून 'ब' श्रेणीतील शाळांना 'अ' वर्गात येण्यासाठी प्रोत्साहन देणे, 'क' आणि 'ड' श्रेणीबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात यावा.आवश्यक ती कठोर कार्यवाही करावी असेही त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,



राज्यातील सैनिकी शाळांची शैक्षणिक व प्रशासकीय गुणवत्ता उंचावण्याबरोबरच पायाभूत सुविधा, प्रशिक्षित मनुष्यबळ आणि सैनिकी प्रशिक्षण अधिक सक्षम करण्यासाठी हा आराखडा महत्त्वपूर्ण ठरणार आहे. राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी तसेच संरक्षण दलांमध्ये अधिकारी म्हणून अधिकाधिक विद्यार्थी दाखल व्हावेत, या उद्देशाने सैनिकी शाळांमध्ये गुणवत्तापूर्ण, पारदर्शक आणि उत्तरदायी व्यवस्था निर्माण करण्यावर या धोरणात भर देण्यात यावा असे निर्देशही त्यांनी दिले.

समितीने राज्यातील प्रत्येक सैनिकी शाळेला प्रत्यक्ष भेट देऊन सखोल पाहणी केल्यानंतर हा अभ्यासपूर्ण अहवाल सादर केला आहे. शासनाने या संस्थांना सुमारे 30 एकर जमीन आणि पायाभूत सुविधा दिल्या असून, त्यांचा प्रभावी वापर करून कामकाजातील त्रुटी दूर करणे आवश्यक आहे, असे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी सांगितले. तसेच, आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शुल्कसहाय्य देणे, प्रवेश परीक्षा अधिक काटेकोर करणे आणि एनडीए व इतर संरक्षण अकादमींच्या तयारीसाठी इंग्रजी माध्यमातील शिक्षणाला प्रोत्साहन देण्याची भूमिका त्यांनी मांडली. भरतीपूर्व प्रशिक्षण देणारी शासकीय संस्था सुरू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असून तिथे सध्या विद्यार्थिनींची पहिली तुकडी प्रशिक्षण घेत आहे; यातून राज्यातील युवक-युवतींना संरक्षण दलात अधिकारी होण्यासाठी मोठी मदत होईल, असेही भुसे यांनी नमूद केले.

दोन लाखांवरील रोख व्यवहारांची माहिती आता आयकर विभागाला जाणार

मुंबई : जमीन किंवा मालमत्तेच्या खरेदी-विक्री व्यवहारात दोन लाख रुपये किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम रोखीने दिल्यास त्याची माहिती आता आयकर विभागाला पाठविली जाणार आहे. यासाठी नोंदणी व मुद्रांक विभागाच्या 'आय-सरिता' प्रणालीत बदल करण्यात येणार असून, दस्त नोंदणी करतानाच रोख आणि धनादेशाद्वारे दिलेल्या रकमेची स्वतंत्र नोंद केली जाणार आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रकांना याबाबत आवश्यक कार्यवाहीचे आदेश दिले आहेत.

मालमत्तेच्या व्यवहारात दोन लाख रुपये किंवा त्यापेक्षा अधिक रक्कम रोखीने दिली किंवा स्वीकारली गेल्यास त्याची माहिती आयकर विभागाला देणे आवश्यक आहे. सर्वोच्च न्यायालयाने १६ एप्रिल २०२५ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने तसेच आयकर कायद्यातील तरतुदींनुसार महसूल विभागाने याबाबत निर्देश दिले होते. त्यानुसार राज्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांना दोन लाख रुपये किंवा त्यापेक्षा अधिक रकमेचे रोख व्यवहार झालेल्या दस्तांची माहिती दर महिन्याच्या पाच तारखेपर्यंत आयकर विभागाला पाठविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

माहिती संकलनाची प्रक्रिया अधिक सुलभ आणि अचूक करण्यासाठी 'आय-सरिता' प्रणालीत ही सुविधा उपलब्ध केली जाणार आहे. दस्त नोंदणीच्या वेळी खरेदीदाराने विक्रेत्याला किती रक्कम रोखीने आणि किती रक्कम धनादेशाद्वारे दिली, याची स्वतंत्र नोंद करता येईल. एका व्यवहारात एकापेक्षा अधिक खरेदीदार किंवा विक्रेते असल्यास प्रत्येक पक्षकाराने दिलेल्या किंवा स्वीकारलेल्या रकमेचाही स्वतंत्र तपशील नोंदविता येणार आहे.

या नोंदींच्या आधारे दुय्यम निबंधक कार्यालयांकडून दर महिन्याच्या पाच तारखेपर्यंत आर्थिक व्यवहारांचा एसएफटी (स्टेटमेंट ऑफ फायनान्शियल ट्रान्झॅक्शन) अहवाल आयकर विभागाला पाठविण्यात येईल. या अहवालात खरेदीदार आणि विक्रेत्याचे नाव, पॅन क्रमांक, व्यवहाराची एकूण रक्कम, रोखीने दिलेली रक्कम, दस्त क्रमांक आणि नोंदणी दिनांक यांचा समावेश असेल.







दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

संपादकीय

'कॅन्डेला पी-12' जहाजामुळे शाश्वत जलवाहतुकीचा नवा अध्याय

राज्याला लाभलेल्या विस्तीर्ण सागरी किनाऱ्याचा वापर करून जलवाहतुकीला नवी दिशा देण्याच्या प्रयत्नात महाराष्ट्राने एक ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. भारतातील पहिल्या पूर्णपणे इलेक्ट्रिक हायड्रोफॉइल जहाजाची अर्थात 'कॅन्डेला पी-१२'ची महाराष्ट्राच्या सागरी हद्दीत यशस्वी चाचणी सुरू झाली असून, देशातील जलवाहतूक क्षेत्रातील ही एक क्रांतिकारी घटना आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांच्या पुढाकारातून साकारलेला हा उपक्रम महाराष्ट्राला आधुनिक व पर्यावरणपूरक सागरी तंत्रज्ञानात देशात आघाडीवर नेणारा ठरेल. स्वीडनमधून आयात करण्यात आलेल्या 'कॅन्डेला पी-१२' या जहाजाची रचना अत्यंत प्रगत हायड्रोफॉइल तंत्रज्ञानावर आधारित आहे. या तंत्रज्ञानामुळे प्रवासादरम्यान जहाजाचा पाण्याशी होणारा थेट संपर्क कमी होतो आणि ते पाण्याच्या पृष्ठभागावर काहीसे उंचावलेल्या स्थितीत अतिशय वेगाने व स्थिरतेने प्रवास करते. पारंपरिक इंधनावर चालणाऱ्या जहाजांच्या तुलनेत हे पूर्णपणे विद्युत ऊर्जेवर चालणारे जहाज ध्वनी आणि वायू प्रदूषण टाळणारे असून, ऊर्जेचीही मोठी बचत करणारे आहे. महाराष्ट्र शासन, रुरल एन्हान्सर्स ग्रुप आणि साधव शिपयार्ड्स लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात आलेला हा प्रयोग सार्वजनिक-खासगी भागीदारीचे एक उत्तम उदाहरण आहे. मुंबईसह कोकण किनारपट्टीवरील शहरी व ग्रामीण भागांतील प्रवाशांना जलद, सुरक्षित आणि आरामदायी प्रवासाचा पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी अशा आधुनिक तंत्रज्ञानाची नितांत गरज होती. रस्ते वाहतुकीवरील ताण कमी करणे आणि कार्बन उत्सर्जनावर नियंत्रण मिळवणे, ही दुहेरी उद्दिष्टे यातून साध्य होणार आहेत. महाराष्ट्र सागरी मंडळाच्या माध्यमातून जागतिक दर्जाचे हे तंत्रज्ञान राज्यात आणून शाश्वत विकासाचा नवा मार्ग प्रशस्त केला गेला आहे. चाचण्या पूर्ण झाल्यानंतर या अत्याधुनिक जलवाहतुकीचा प्रत्यक्ष लाभ सर्वसामान्य प्रवाशांना लवकरात लवकर मिळावा आणि किनारपट्टीच्या पर्यटनाला व अर्थव्यवस्थेला नवी गती मिळावी, हीच अपेक्षा आहे.

मराठा समाजातील विद्यार्थ्यांनाही शैक्षणिक शुल्कात सवलत; कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांची घोषणा

मुंबई : राज्यातील कृषी शिक्षण घेणाऱ्या मराठा समाजातील पात्र विद्यार्थ्यांना आता ओबीसी विद्यार्थ्यांप्रमाणे शैक्षणिक शुल्कात सवलत मिळणार आहे. राज्य सरकारने यासंदर्भात मंजुरी दिली असून, शैक्षणिक वर्ष 2026-27 पासून या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे. राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी ही माहिती दिली.

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांच्या अंतर्गत येणाऱ्या कृषी आणि कृषी संलग्न महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेणाऱ्या मराठा समाजातील पात्र विद्यार्थ्यांना या निर्णयाचा लाभ मिळणार आहे. ओबीसी विद्यार्थ्यांप्रमाणेच त्यांनाही शैक्षणिक शुल्क आणि विविध महाविद्यालयीन शुल्कांमध्ये सवलत दिली जाणार आहे.

याबाबत कृषी विभागाने 20 नोव्हेंबर 2026 रोजी शासन परिपत्रक जारी केले आहे. शासनाने निश्चित केलेल्या पात्रतेच्या निकषांनुसारच विद्यार्थ्यांना या सवलतीचा लाभ मिळेल.

या निर्णयानुसार पात्र विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क आणि परीक्षा शुल्कासह प्रवेश शुल्क, ग्रंथालय शुल्क, जिमखाना शुल्क, नोंदणी शुल्क आणि विद्यार्थी सहाय्य व कल्याण निधीमध्ये सवलत मिळणार आहे. याशिवाय विमा निधी, महाविद्यालयीन मासिक शुल्क, वैद्यकीय मदत निधी आणि विद्यार्थी ओळखपत्र शुल्काचाही यात समावेश आहे.

आर्थिक अडचणींमुळे शिक्षण थांबणार नाही

शेतकरी कुटुंबातील विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींमुळे उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागू नये, हा सरकारचा उद्देश असल्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले. या निर्णयामुळे मराठा समाजातील पात्र विद्यार्थ्यांचा कृषी शिक्षणावरील आर्थिक भार कमी होण्यास मदत होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी चारही कृषी विद्यापीठांना पात्रतेच्या निकषांची काटेकोर तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांना आवश्यक समन्वय साधण्यास सांगण्यात आले आहे.

गायरानवरील वृक्षतोडीवर कारवाई नाही; आडगाव-देव्हारी पाणंद रस्त्याचे काम रखडले ग्रामस्थांचे पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन



कन्नड : दि.२० नोव्हेंबर - गायरान जमिनीवरील वृक्षतोडीप्रकरणी अद्याप कारवाई करण्यात आलेली नाही, तसेच दोन वर्षांपूर्वी मंजूर झालेल्या आडगाव ते देव्हारी पाणंद रस्त्याचे काम अद्याप सुरू झालेले नाही. या दोन्ही प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आडगाव भोसले (ता. कन्नड) येथील ग्रामस्थांनी शुक्रवारी (दि. २० नोव्हेंबर २०२६) दुपारी १२ वाजेपासून पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन सुरू केले. गावातील गायरान जमिनीवरील वृक्षतोडीच्या प्रकरणात अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा ग्रामस्थांचा आरोप आहे. तसेच दोन वर्षांपूर्वी मंजूर झालेल्या आडगाव ते देव्हारी पाणंद रस्त्याचे काम अद्याप सुरू झालेले नाही. हे काम तातडीने सुरू करावे आणि वृक्षतोडीप्रकरणी संबंधितांवर कारवाई करावी, अशा मागण्या आंदोलकांनी केल्या.

दरम्यान, प्रशासनाच्या वतीने मंडळाधिकारी विकास वाघ, तलाठी अमोल राऊत, विस्तार अधिकारी संतोष दारकुंडे आणि ग्रामसेवक देविदास ढेपले यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन आंदोलकांशी चर्चा केली. मात्र, चर्चेतून कोणताही ठोस मार्ग निघाला नाही. त्यामुळे आंदोलन सुरूच राहिले. उबेली-पिशोर पोलिसांकडून यावेळी बंदोबस्त ठेवण्यात आला होता. शुक्रवारी सायंकाळी ६ वाजेपर्यंत हे आंदोलन सुरू होते. या आंदोलनात गणेश भोसले, राजेंद्र भोसले, समाधान सोनवणे, अमोल भोसले, विशाल भोसले, योगेश भोसले, आकाश जाधव, बापूसाहेब सुस्ते, गोविंद भोसले, श्रीहरी भोसले, समाधान भोसले, हर्षद भोसले, कुणाल सुस्ते, सचिन भोसले, सदाशिव भोसले, बाळू भोसले यांच्यासह गावातील नागरिक सहभागी झाले होते.

वनामकृविचा 28 वा दीक्षांत समारंभ उत्साहात संपन्न; 3,114 स्नातकांना पदव्या प्रदान

कृषि उद्योजक बनून नोकरी देणारे व्हा; माननीय कृषिमंत्री श्री. दत्तात्रय भरणे यांचे स्नातकांना आवाहन.

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी



परभणी**हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जाण्यासाठी शाश्वत शेती तंत्रज्ञानाचा अवलंब आवश्यक; माननीय पद्मश्री डॉ. अशोक कुमार सिंह यांचे प्रतिपादन

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचा २८ वा दीक्षांत समारंभ दिनांक २० नोव्हेंबर २०२६ रोजी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण कार्यालय परिसरातील सुवर्ण जयंती दीक्षांत सभागृहात संपन्न झाला. महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल तथा विद्यापीठाचे कुलपती श्री. जिष्णु देव वर्मा यांच्या निर्देशानुसार, महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १८(१) मधील तरतुदींनुसार या दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी भूषविले.

या समारंभाचे सन्माननीय अतिथी महाराष्ट्र राज्याचे माननीय कृषिमंत्री तथा विद्यापीठाचे प्रति-कुलपती श्री. दत्तात्रय भरणे यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे मार्गदर्शन केले. नवी दिल्ली येथील राष्ट्रीय कृषी विज्ञान अकादमीचे (NAAS) सचिव तथा भाकृअप–भारतीय कृषी संशोधन संस्थेचे (ICAR-IARI) माजी संचालक व माजी कुलगुरू पद्मश्री डॉ. अशोक कुमार सिंह प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांनी दीक्षांत अभिभाषण केले.

अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख, राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे, तसेच वनामकृविचे माजी कुलगुरू डॉ. वेदप्रकाश पाटील, डॉ. किसनराव गोरे आणि डॉ. अशोक ढवण यांची प्रमुख उपस्थिती होती

व्यासपीठावर विधान परिषद सदस्य आमदार डॉ. प्रतापसिंह पाटील, विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य तथा भारतीय कृषी संशोधन परिषदेचे (ICAR) माजी उपमहासंचालक (कृषी शिक्षण) डॉ. आर. सी. अग्रवाल, कृषी परिषदेचे महासंचालक श्री. राहुल रंजन महिवाल (भाप्रसे), कृषी परिषदेचे सदस्य श्री. जनार्दन कातकडे, संशोधन संचालक डॉ. भगवान आसेवार, विस्तार शिक्षण संचालक डॉ. राकेश अहिरे, शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे, कुलसचिव श्री. पुरभा काळे, विद्यापीठ अभियंता श्री. दीपक कशाळकर, नियंत्रक श्रीमती भाग्यश्री जाधव, उपकुलसचिव डॉ. गजानन भालेराव आदी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्रासह मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन विद्यापीठाचा २८ वा दीक्षांत समारंभ अत्यंत साध्या स्वरूपात आयोजित करण्यात आला.

या दीक्षांत समारंभात सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात विविध विद्याशाखांतील पदवी, पदव्युत्तर पदवी आणि आचार्य पदवी अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या एकूण ३,११४ स्नातकांना पदव्या प्रदान करण्यात आल्या. यामध्ये आचार्य पदवीचे २९, पदव्युत्तर पदवीचे २९२ आणि पदवी अभ्यासक्रमाचे २,७९३ स्नातकांचा समावेश होता.

याशिवाय, कृषी आणि शेतीपूरक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना विविध मानद पदव्यांनी सन्मानित करण्यात आले. राज्यसभा सदस्य तथा महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री खासदार श्री. अशोकराव चव्हाण यांना मानद 'डॉक्टर ऑफ सायन्स' पदवी (अनुपस्थित), तर प्रगतशील शेतकरी श्री. चंद्रकांत वरपूडकर आणि श्री. चंद्रशेखर भडसावळे यांना मानद 'कृषिरत्न' उपाधी प्रदान करण्यात आली. तसेच, मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांतील १५ प्रगतशील शेतकऱ्यांना 'शेतकरी शास्त्रज्ञ पुरस्कार' आणि सहा प्रगतशील शेतकऱ्यांना 'नवोन्मेषी शेतकरी पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले.

२८ व्या दीक्षांत समारंभापर्यंत कृषी आणि संलग्न शाखांमधील एकूण ७२,१०१ स्नातकांना पदव्या प्रदान करण्यात आल्या आहेत. याशिवाय, कृषी पदविका अभ्यासक्रमाची ६१,३८१ प्रमाणपत्रे तसेच उद्यानविद्या अभ्यासक्रमाची १,४२४ प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली आहेत. अशा प्रकारे, एकूण १,३४,९०६ कुशल मनुष्यबळाच्या निर्मितीत विद्यापीठाने मोलाचे योगदान दिले आहे.

या समारंभात सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील विविध अभ्यासक्रमांमध्ये प्रावीण्य संपादन करणाऱ्या गुणवंत स्नातकांना विद्यापीठ आणि दात्यांच्या वतीने सुवर्णपदके, रौप्यपदके, रोख पारितोषिके आणि गुणवत्ता प्रमाणपत्रे प्रदान करून गौरविण्यात आले. यामध्ये एकूण ६३ पदके व पारितोषिकांचा समावेश होता. त्यात विद्यापीठाची १४ सुवर्णपदके, दात्यांकडून प्रदान करण्यात येणारी १४ सुवर्णपदके, एक रौप्यपदक, नऊ रोख पारितोषिके आणि २५ पदव्युत्तर पदवी गुणवत्ता प्रमाणपत्रांचा समावेश होता.

माननीय कृषिमंत्री तथा विद्यापीठाचे प्रति-कुलपती श्री. दत्तात्रय भरणे यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी पदवी प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून सांगितले की, विद्यार्थ्यांना पदवीधर होताना जितका आनंद होत आहे, तितकाच आनंद त्यांच्या आई-वडिलांना होत आहे. त्यांच्या या यशाचा मला देखील तितकाच आनंद होत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. मी स्वतः शेतकरी कुटुंबातून आलो असल्यामुळे शेतकरी कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाचे आणि त्यांच्या यशाचे महत्त्व मला चांगलेच ठाऊक आहे, असे त्यांनी नमूद केले.

वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्रात हरितक्रांतीचा पाया रचला असून, ही हरितक्रांती पुढे नेण्याची जबाबदारी आता नव्या पिढीवर आहे. विद्यार्थ्यांनी केवळ नोकरी मिळविण्याच्या उद्देशाने शिक्षण न घेता उद्योग-व्यवसाय आणि कृषी उद्योजकतेकडे वळावे, असे आवाहन त्यांनी केले. आपण सर्वजण 'ॲग्रीकॉस' म्हणून ओळखले जाता. या ओळखीचा गौरव अधिक उंचावण्यासाठी विद्यापीठाने विकसित केलेले आधुनिक कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आपण करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

कृषी उद्योजकता, कृषी निर्यात, कृषी स्टार्टअप आणि कृषी आधारित उद्योगांमध्ये मोठ्या संधी उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांनी या संधींचा लाभ घ्यावा. नोकरीच्या मागे न लागता नोकरी देणारे उद्योजक बना. यासाठी महाराष्ट्र शासन आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे, अशी ग्वाही त्यांनी दिली. माननीय मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य शासन शेतीच्या विकासासाठी कार्यरत असून, दुष्काळी परिस्थितीतही शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

पदवी ही केवळ विद्यार्थ्यांच्या कष्टांची फलश्रुती नसून, ती आई-वडिलांच्या अथक परिश्रमांचे फळ आणि बळीराजाच्या आशा-आकांक्षांचे प्रतीक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शेतकऱ्यांना आधार व धीर देत त्यांच्या सुख-दुःखात सहभागी व्हावे आणि शेतीच्या विकासासाठी योगदान द्यावे, असे आवाहन करून त्यांनी सर्व स्नातकांना यशस्वी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांनी अध्यक्षीय भाषणात सर्व मान्यवरांचे स्वागत करून विद्यापीठाच्या कार्याचा आणि शेतकरी कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. कृषी क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल माननीय राज्यपाल महोदयांच्या मान्यतेने महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा सदस्य खासदार माननीय श्री. अशोकराव चव्हाण यांना मानद 'डॉक्टर ऑफ सायन्स' पदवीने, तर प्रगतशील शेतकरी श्री. चंद्रकांतदादा वरपूडकर आणि श्री. चंद्रशेखर भडसावळे यांना मानद 'कृषिरत्न' उपाधीने सन्मानित करण्यात आल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला.

देश, राज्य आणि विद्यापीठ हे शेतकरी केंद्रित दृष्टिकोनातून कार्य करीत आहेत. माननीय मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार आणि सूचनेनुसार शेतकऱ्यांचाही पुरस्कार देऊन गौरव करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार मराठवाड्यातील २१ प्रगतशील शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात आले असून, त्यामध्ये १५ शेतकऱ्यांना 'शेतकरी शास्त्रज्ञ पुरस्कार', तर सहा शेतकऱ्यांना 'नवोन्मेषी शेतकरी पुरस्कार' प्रदान करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

पुरस्कार हे केवळ आजवर केलेल्या कार्याची पावती नसून, भविष्यात समाजोपयोगी आणि शेतकरी कल्याणाचे कार्य करण्याची जबाबदारी वाढविणारे असतात, असे त्यांनी स्पष्ट केले. विद्यापीठाने 'शेतकरी देवो भव' ही भावना जोपासत सातत्याने शेतकरी हितासाठी कार्य केले आहे. शेतकऱ्यांनी आपल्या कार्यात पुढे जाताना विद्यापीठ त्यांच्या पाठीशी सदैव उभे राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

भारतीय संस्कृतीत 'जय जवान, जय किसान' या घोषणेतून शेतकऱ्यांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे. राष्ट्रीय स्तरावरही कृषी क्षेत्राचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. देशाचे माननीय कृषिमंत्री शेतकरी देवतुल्य असून, शेतकऱ्यांची सेवा म्हणजेच ईश्वराची सेवा असल्याचे सातत्याने सांगतात. मागील दीक्षांत समारंभात परभणी येथील प्रगतशील शेतकरी श्री. श्रीरंग देवबा लाड यांना मानद 'डॉक्टर ऑफ सायन्स' पदवीने सन्मानित करण्यात आले होते. त्यानंतर राष्ट्रीय स्तरावर त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले. मराठवाड्यातील इतर शेतकऱ्यांनीही अशाच प्रकारे प्रगती साधून राष्ट्रीय स्तरावर आपली ओळख निर्माण करावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या दीक्षांत समारंभात विद्यापीठाने एकूण ३,११४ स्नातकांना विविध पदव्या प्रदान केल्या असून, गुणवंत विद्यार्थ्यांना सुवर्णपदके, रौप्यपदके, रोख पारितोषिके आणि गुणवत्ता प्रमाणपत्रे अशा एकूण ६३ पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. हे विद्यार्थी भविष्यात राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात मोलाचे योगदान देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सर्व स्नातकांनी 'मातृदेवो भव, पितृदेवो भव, देशदेवो भव' ही संकल्पना प्रत्यक्ष जीवनात अंगीकारावी. आपल्या आई-वडिलांप्रती कृतज्ञता व्यक्त करताना देशसेवा आणि शेतकरी कल्याणासाठी समर्पित भावनेने कार्य करण्याची प्रतिज्ञा करावी, असे आवाहन त्यांनी केले. विद्यापीठातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये मुलींचे प्रमाण सुमारे ९० टक्क्यांच्या आसपास असून, हा मोठा सामाजिक बदल असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यापीठाच्या शैक्षणिक, संशोधन आणि विस्तार कार्यामध्ये महिला शास्त्रज्ञांचे योगदानही महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी सांगितले.

सध्या विद्यापीठ केवळ ३५ टक्के मनुष्यबळावर कार्यरत असून, नवीन आकृतिबंधानुसार ९१० पदांना मंजुरी मिळाली आहे. विद्यापीठातील रिक्त पदांची भरती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मंचावर उपस्थित आमदार डॉ. प्रतापसिंह पाटील आणि कृषी परिषदेचे महासंचालक श्री. राहुल रंजन महिवाल यांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यापीठातील शास्त्रज्ञांना परदेशातील विविध संस्थांना भेटी देण्याची आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधनाचा अनुभव घेण्याची संधी मिळाल्यामुळे विद्यापीठाच्या संशोधन कार्यात आमूलाग्र बदल घडून आले आहेत. यासाठी कृषी शिक्षण क्षेत्रात डॉ. आर. सी. अग्रवाल यांनी सुरू केलेल्या विविध योजनांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी नमूद केले.

परभणी येथील विद्यापीठ तीन बाजूंनी ग्रामीण परिसराने वेढलेले असून, एका बाजूला छोटे शहर आहे. त्यामुळे हे खऱ्या अर्थाने ग्रामीण विद्यापीठ आहे. तसेच देशाच्या मध्यवर्ती ठिकाणी असल्याचा विद्यापीठाला भौगोलिक लाभ मिळतो. विद्यापीठाला राष्ट्रीय स्तरावर अधिक चांगले मानांकन मिळविण्यासाठी आवश्यक ते पाठबळ मिळणे गरजेचे आहे. विद्यापीठ यासाठी सातत्याने प्रयत्नशील असून, अलीकडेच ११ संशोधन प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहेत. तसेच सुमारे १,००० विद्यार्थ्यांना आयआयटीसारख्या प्रतिष्ठित संस्थांमध्ये प्रशिक्षण देण्यात आले आहे. या सर्व प्रयत्नांमुळे विद्यापीठ प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

विद्यापीठात कार्य करताना आपल्याला कधीही परकेपणाची भावना जाणवली नाही, असे सांगून त्यांनी राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील सर्व मान्यवरांचे सहकार्याबद्दल आभार मानले. कार्य करताना येणाऱ्या अडचणींना आव्हान म्हणून स्वीकारून त्यांचे संधीत रूपांतर करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे विद्यापीठाच्या प्रगतीला गती मिळाली, असे त्यांनी नमूद केले.

विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कार्यासाठी कठोर परिश्रम घ्यावेत. केवळ इच्छा व्यक्त करून यश मिळत नाही, तर त्या इच्छेच्या पूर्ततेसाठी कृती करणे आवश्यक आहे. आपण केलेले कार्य भविष्यातील ५० वर्षांपर्यंत स्मरणात राहील, असे असावे, असे आवाहन त्यांनी केले. जीवनात सदैव आनंदी राहून मनःशांती जपावी, इतरांच्या भावनांचा आदर करावा, कोणाचाही उपहास करू नये, तसेच करुणा, सद्भावना आणि दयाभाव जोपासावा. सकारात्मक दृष्टिकोन ठेवून आपल्याजवळील ज्ञान, धर्म आणि शक्ती यांचा योग्य उपयोग करावा. यातूनच व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास साधता येतो, असे सांगून त्यांनी सर्व स्नातकांना यशस्वी जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.

प्रमुख अतिथी पद्मश्री डॉ. अशोक कुमार सिंह यांनी आपल्या दीक्षांत अभिभाषणात वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने मागील साडेचार वर्षांच्या कालावधीत माननीय कुलगुरू प्रा. (डॉ.) इन्द्र मणि यांच्या नेतृत्वाखाली केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव केला. विद्यापीठाच्या या कार्यामुळे राष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाची उंची आणि ओळख वाढली असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी त्यांनी भारतीय कृषी अनुसंधान परिषदेच्या स्थापनेपासून देशातील कृषी विद्यापीठांच्या शैक्षणिक, संशोधन आणि विस्तार कार्याच्या विकासातील योगदानाचा आढावा घेतला. मागील दशकात भारतीय कृषी क्षेत्राने उल्लेखनीय प्रगती केली असल्याचे त्यांनी सांगितले. भारताच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात (GDP) कृषी क्षेत्राचा सुमारे १८.२ टक्के वाटा असून, देशातील ४५.६ टक्के लोकसंख्येच्या उपजीविकेचा आधार कृषी क्षेत्र आहे. सन २०५० पर्यंत भारताची लोकसंख्या १.६४ अब्ज होण्याची शक्यता असून, त्या अनुषंगाने अन्नधान्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. त्याचवेळी नैसर्गिक साधनसंपत्तीचे संवर्धन करणेही आवश्यक आहे. हवामान बदलामुळे शाश्वत शेतीसमोर निर्माण होणारी आव्हाने लक्षात घेता, उपलब्ध नैसर्गिक साधनसंपत्तीचा कार्यक्षम वापर करून अधिक उत्पादनक्षम आणि शाश्वत शेती विकसित करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

हवामान बदल हा भविष्यातील शेतीसमोरील अत्यंत महत्त्वाचा विषय असून, त्यावर विशेष लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे. या दृष्टीने वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाने राबविलेल्या विविध उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले. शून्य मशागत तंत्रज्ञान (Zero Tillage), गव्हातील कमी मशागत पद्धती, जमीन सपाटीकरण (Laser Land Levelling), भाताचे थेट पेरणी तंत्रज्ञान (Direct Seeded Rice), खतांचा कार्यक्षम वापर, जैविक खतांचा वापर तसेच सेंद्रिय व नैसर्गिक शेती या तंत्रज्ञानांचा अवलंब केल्यास उत्पादन खर्च कमी होण्यासोबतच हरितगृह वायूंचे उत्सर्जनही कमी करता येईल. तसेच कार्बन क्रेडिटच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळविण्याची संधी उपलब्ध होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.

अचूक शेतीसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), जीपीएस आधारित तंत्रज्ञान, उपग्रह आधारित तंत्रज्ञान, रिमोट सेन्सिंग, इंटरनेट ऑफ थिंग्ज (IoT), भौगोलिक माहिती प्रणाली (GIS) आणि ड्रोन तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. या तंत्रज्ञानांच्या माध्यमातून अचूक माहिती उपलब्ध होऊन शेतकऱ्यांना कीडनाशके, खते आणि इतर कृषी निविष्ठांच्या व्यवस्थापनाबाबत योग्य निर्णय घेणे शक्य होईल. यासाठी माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी जी यांनी अलीकडेच सुरू केलेल्या मोबाईल ॲपचाही शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

शेतकऱ्यांचे कृषी विकासातील योगदान अत्यंत मोलाचे असल्यामुळे विद्यापीठाने यंदाच्या दीक्षांत समारंभात शेतकऱ्यांचाही विशेष सन्मान केला आहे, ही अभिमानास्पद बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी शिक्षण पूर्ण करून पदवी प्राप्त केली असली, तरी ही त्यांच्या नव्या जबाबदारीची सुरुवात आहे. शिक्षणाचा प्रारंभ जसा होतो, तसाच दीक्षांत समारंभातून कुलगुरूंच्या हस्ते दीक्षा घेऊन एका नव्या प्रवासाचा प्रारंभ होतो. या प्रसंगी स्नातकांनी दूरदृष्टी आणि दृढनिश्चय ठेवून राष्ट्रनिर्मितीसाठी महत्त्वपूर्ण योगदान द्यावे. तसेच गुरु-शिष्य नात्याचे पावित्र्य आणि महत्त्व आयुष्यभर जपावे, असे आवाहन त्यांनी केले.

विद्यापीठाचे शिक्षण संचालक डॉ. बाबासाहेब ठोंबरे यांनी विद्यापीठाच्या प्रगती अहवालाचे वाचन केले. यामध्ये त्यांनी विद्यापीठाच्या शैक्षणिक कार्याचा सविस्तर आढावा घेतला. विद्यापीठाने राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील (NEP) विविध तरतुदींची प्रभावी अंमलबजावणी केली असून, देशातील २० राज्यांमधील विद्यार्थी विद्यापीठात शिक्षण व प्रशिक्षण घेत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून नऊ विविध देशांना भेटी देऊन आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक अनुभव घेतला आहे. विद्यापीठाचे संशोधन आणि विस्तार शिक्षण कार्यही अग्रगण्य असून, या क्षेत्रांत विद्यापीठाने अनेक महत्त्वपूर्ण यश संपादन केल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. वीणा भालेराव आणि डॉ. रणजित चव्हाण यांनी केले.

जमीन व्यवस्थापन, पायाभूत सुविधा आणि कृषी उत्पादकतेवर भर; मुख्यमंत्री फडणवीसांची नीती आयोगासोबत बैठक

मुंबई : महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी दीर्घकालीन नियोजन, जमिनीचे योग्य व्यवस्थापन, पायाभूत सुविधा प्रकल्पांना गती देणे आणि कृषी क्षेत्रातील उत्पादकता वाढवणे हे अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. या सर्व आघाड्यांवर राज्य शासन अत्यंत प्रभावीपणे काम करत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानी नीती आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. अशोककुमार लाहिरी यांच्यासोबत राज्यातील विविध विकास प्रकल्पांबाबत शुक्रवारी सविस्तर आढावा बैठक पार पडली, त्यावेळी त्यांनी हे विधान केलं. यावेळी देवेंद्र फडणवीस यांनी नीती आयोगाचे आभारही माने. नीती आयोगाकडून राज्याला नेहमीच मार्गदर्शन आणि उपयुक्त सल्ले मिळत आले आहेत. यापुढेही आयोगाचे सहकार्य व मार्गदर्शन मिळेल, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. राज्यातील विकासकामे निश्चित गतीने पूर्ण करण्यासाठी शासन कृतीशील असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.



वाढवण बंदराच्या कामाबाबत समाधान

या बैठकीत जमीन अधिग्रहणाच्या दीर्घकालीन नियोजनावर विशेष भर देण्यात आला. जमीन अधिग्रहण, पायाभूत सुविधा आणि कृषी क्षेत्रातील प्रलंबित प्रश्न प्राधान्याने मार्गी लावावेत, अशी सूचना डॉ. अशोककुमार लाहिरी यांनी केली. जमिनीचा नियोजनबद्ध विकास आणि योग्य व्यवस्थापनातून राज्याला मोठ्या प्रमाणात महसूल मिळू शकतो, असंही त्यांनी सांगितलं. आज कमी किमतीत उपलब्ध असलेली जमीन भविष्यात अधिक मौल्यवान ठरेल; त्यामुळे पुढील पिढ्यांचा विचार करून भविष्यातील प्रकल्पांसाठी आगाऊ जमीन अधिग्रहण धोरण आखणे गरजेचे असल्याचे मत डॉ. लाहिरी यांनी मांडले. विशेष म्हणजे, राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी वाढवण बंदर प्रकल्पाच्या कामाच्या प्रगतीबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

बैठकीस परिवहन व बंदरे विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव संजय सेठी, नगर

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

गांधी विद्यालयाच्या सात विद्यार्थ्यांची इस्रो श्रीहरिकोटा येथील अंतराळ केंद्राला शैक्षणिक भेट



हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी : गांधी विद्यालय माध्यमिक, परभणी येथील शौर्य ज्ञानेश्वर पांचाळ, वैभव ज्ञानेश्वर पांचाळ, कु. शौर्या विठ्ठलराव भुसारे, कु. सुचिता भास्कर चिमटे, देवांश राहुल उबाळे, चिंतामणी अनिल घोडके आणि समृद्ध बाबासाहेब मस्के या सात विद्यार्थ्यांनी १८ नोव्हेंबर रोजी आंध्र प्रदेशातील श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्राला (SDSC-SHAR) शैक्षणिक भेट दिली. दि. ११ ऑक्टोबर २०२६ रोजी ASM ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, पिंपरी, पुणे येथे आयोजित राष्ट्रीय स्तरावरील कलाम STREAM चॅलेंज २०२६ मध्ये उत्कृष्ट मॉडेल सादरीकरण केल्याबद्दल या विद्यार्थ्यांची इस्रो भेटीसाठी निवड झाली होती.

या स्पर्धेत शौर्य व वैभव पांचाळ यांनी MULTIPURPOSE DOMESTIC ANIMAL SAVING SHELTER, शौर्या भुसारे व सुचिता चिमटे यांनी SMART INFANT CARE MAT, तर देवांश उबाळे, चिंतामणी घोडके व समृद्ध मस्के यांनी SUSTAINABLE TOILET AND WASH BASIN ही मॉडेल्स सादर केली होती. या तिन्ही मॉडेल्सनी परीक्षकांचे विशेष लक्ष वेधले होते.

इस्रो भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी मिशन कंट्रोल सेंटर (MCC), कार्यरत लॉन्च पॅड-१ व लॉन्च पॅड-२ तसेच डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्याशी ऐतिहासिक संबंध असलेल्या SLV-3 लॉन्च पॅडची माहिती घेतली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शक शिक्षक श्री. मिलिंद बगाटे, श्री. बाबासाहेब मस्के व शिक्षिका सौ. कान्होपात्रा उन्हाळे यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच शाळा प्रशासन व पालकांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

या अविस्मरणीय भेटीमुळे विद्यार्थ्यांना अंतराळ संशोधन व आधुनिक अवकाश तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष माहिती मिळून भविष्यात वैज्ञानिक होण्याची प्रेरणा मिळाली. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल गांधी विद्यालय परिवाराकडून सर्वांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

टिपू सुलतान यांची जयंती निमित्त पेडगाव येथे भव्य रक्तदान शिबीर संपन्न



परभणी**टिपू सुलतान यांच्या जयंतीनिमित्त परभणी तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने पेडगाव फाटा येथील काँग्रेस पक्ष कार्यालयात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते काँग्रेस यावेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार बाबाजानी दुर्राणी यांच्या मार्गदर्शनाखाली हे शिबिर फार मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आले.

रक्तदान से हे श्रेष्ठदान असून गरजू रुग्णांना जीवदान मिळावे या सामाजिक भावनेतून हा उपक्रम राबवण्यात आला जयंती टिपू सुलतान यांच्या जयंतीनिमित्त रक्तदानासारख्या विधायक उपक्रम राबवून परभणी तालुक्यातील काँग्रेस कमिटीने सामाजिक बांधिलकी जपली रक्तदान शिबिरास जिल्हा परिषद सदस्य जितेंद्र देशमुख पंचायत समिती सदस्य शेषराव देंगे बेळगाव येथील सरपंच आशिष हरकळ ग्रामपंचायत सदस्य मोबीन कुरेशी ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब खरात पोलीस पाटील तावजी हरकळ .निखिल मांडे .बाळू खरात. हरेश पठाण. सय्यद मेहराज. सोपानरावदेशमुख. धोंडीराम सातवणे. अन्वर खान. शकील खान .अमजद भाई .शेख इर्शाद .दिलावर खान शेख फरीद शेख खाजा. सय्यद मोबीन अन्वर खान .आसिफ खान. लतीफ खान पठाण .शेख मुजम्मिल शेख रियाज. यांनी यावेळी रक्तदान केले याप्रसंगी हुजूर साहेबब्लड बँक चे शंकर मोरे. विशाल राठोड. नितीन जाधव. ऐश्वर्या वाढवे. नेहा शेळके काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते युवक आणि परिसरातील नागरिकांनी या रक्तदान शिबिरात भाग घेऊन ।उत्स्फूर्त सहभाग नोंदवला .

ऊसदरासाठी 22 नोव्हेंबरला पाणपोई फाट्यावर रास्ता रोको

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचा इशारा



कन्नड :दि.२० नोव्हेंबर - ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य भाव मिळावा, या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आता आंदोलन तीव्र करण्याचा निर्णय घेतला आहे. येत्या २२ नोव्हेंबर रोजी पाणपोई फाटा येथे सोलापूर-धुळे महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याची घोषणा संघटनेने पत्रकार परिषदेत केली. बारामती ॲग्रोने उसाला एकूण ४२०० रुपये प्रतिटन भाव द्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा कृषीभूषण भाऊसाहेब थोरात यांनी दिला. संघटनेच्या मागणीनुसार उसाला पहिली उचल ३९०० रुपये प्रतिटन मिळावी. तसेच साखरेच्या दरानुसार हंगाम संपल्यानंतर १०० रुपये आणि पुढील हंगाम सुरू होताना २०० रुपये असे एकूण ४२०० रुपये प्रतिटन भाव मिळावा, अशी मागणी करण्यात आली आहे. मात्र, कारखान्याने जाहीर केलेला ३२०० रुपये प्रतिटन दर मान्य नसल्याचे थोरात यांनी स्पष्ट केले.

ऊसदराच्या मागणीसाठी यापूर्वी १७ ऑक्टोबर रोजी पाणपोई फाटा येथे २० तास ऊस वाहतूक बंद आंदोलन करण्यात आले होते. त्यानंतर १६ नोव्हेंबरपासून कारखाना गेटवर काटा व गव्हाण बंद आंदोलनही करण्यात आले. १८ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात शेतकरी प्रतिनिधी, कारखाना प्रशासन आणि आमदार प्रशांत बंब यांच्या उपस्थितीत बैठक झाली. मात्र, या बैठकीतही ऊसदराचा ठोस निर्णय न झाल्याने संघटनेने आता महामार्ग रोकोचा निर्णय घेतला आहे. २२ नोव्हेंबर रोजी होणारे आंदोलन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली शांततेत; मात्र ठामपणे करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. शेतकऱ्यांना योग्य भाव मिळेपर्यंत संघर्ष सुरूच राहील, असा निर्धार संघटनेने व्यक्त केला. या पत्रकार परिषदेला जिल्हाध्यक्ष कृष्णा साबळे, मराठवाडा संघटक दिनकर पवार, तालुकाध्यक्ष प्रकाश बोरसे, युवा नेते दीपक शेजवळ, शिवाजीराव बचाटे, राजूभाऊ बोंगाणे, गोकुळ आहेर, ॲड. कृष्णा जाधव, अविनाश डगळे, सुनील बोडखे, प्रदीप डगळे आदी उपस्थित होते.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेतील एकवेळ समझोता अंतर्गत 4 हजार 759 लाभार्थ्यांची यादी प्रसिद्ध

ग्रामपंचायत, बँक शाखा व विकास संस्थांमध्ये यादी उपलब्ध

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी : राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत एकवेळ समझोता अंतर्गत पात्र ठरलेल्या परभणी जिल्ह्यातील ४ हजार ७५९ पात्र शेतकऱ्यांची यादी आज प्रसिद्ध करण्यात आली आहे. पात्र शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी ही यादी संबंधित ग्रामपंचायत, बँक शाखा तसेच विकास संस्थांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे, असे जिल्हा उपनिबंधक (सहकारी संस्था) विकास जगदाळे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

महाराष्ट्र शासनाने दि. 2 जून २०२६ रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ राबविण्यात येत आहे. या योजनेत कर्जमाफी, एकवेळ समझोता आणि प्रोत्साहन अशा तीन घटकांचा समावेश आहे.

योजनेच्या पहिल्या टप्प्यात कर्जमाफी घटकाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. परभणी जिल्ह्यात दि. २४ जुलै, ११ सप्टेंबर, १२ ऑक्टोबर आणि २२ ऑक्टोबर २०२६ रोजी प्राप्त याद्यांनुसार एकूण १ लाख ३६ हजार ८०९ शेतकऱ्यांच्या याद्यांची पडताळणी करण्यात आली. त्यापैकी आधार प्रमाणीकरण केलेल्या १ लाख १३ हजार ९७२ शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये १ हजार ४१ कोटी ७५ लाख रुपयांची कर्जमाफी करण्यात आली आहे.

योजनेच्या दुसऱ्या टप्प्यामध्ये एकवेळ समझोता (OTS) अंतर्गत पात्र शेतकऱ्यांनी रु. 2 लाखांवरील शेतकऱ्यांच्या हिश्याची रक्कम बँकेत भरल्यानंतर रु.2 लाखाचा कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे. परभणी जिल्ह्यातील बँकाकडील माहितीचे संगणकीय संस्करण करुन एकूण 4759 पात्र शेतकऱ्यांची यादी आज दि. 20 नोव्हेंबर 2026 रोजी आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे. एकवेळ समझोता (OTS) अंतर्गत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची यादी बँक शाखा, विकास संस्था व ग्रामपंचायतीमध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

एक वेळ समझोता अंतर्गत पात्र शेतकऱ्याच्या कर्जखात्यासंदर्भात पुढीलप्रमाणे कार्यवाही अवलंबली जाणार आहे.

एक वेळ समझोता अंतर्गत पात्र शेतकऱ्यांच्या कर्ज खात्याची यादी आज प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही यादी गावपातळीवर ग्रामपंचायत तसेच बँकेच्या शाखेत व विकास संस्थेच्या शाखेमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रसिद्ध केलेल्या यादीमध्ये शेतकऱ्यांचे नाव, गाव, विशिष्ट क्रमांक, बँक कर्जखाते तपशिल, दि.31 मार्च 2026 अखेरच्या थकबाकीची रक्कम, एकवेळ समझोता (OTS) प्रमाणे थकबाकीची रक्कम, एकवेळ समझोता प्रमाणे शेतकऱ्याने भरावयाची रक्कम व शासना मार्फत देण्यात येणाऱ्या लाभाची रक्कम नमुद आहे.

शेतकऱ्याने प्रसिद्धी यादीतील तपशिल तपासुन त्यांच्या हिश्याची रु.2.00 लाखावरील रक्कम संबंधीत बँकेत भरणा करावयाची आहे. ज्या शेतकऱ्यांच्या कर्जखाते एकाच बँकेत आहे, अशा शेतकऱ्यांनी यादीत नमूद केलेली रक्कम संबंधीत बँकेच्या कर्जखात्यात भरणा करावी.

ज्या शेतक-यांची एकापेक्षा जास्त कर्जखाती आहेत अशा शेतकऱ्यांनी त्यांच्या हिश्शाची रक्कम त्यांच्या कोणत्याही कर्ज खात्यात भरण्याची सुविधा आहे. परंतु शेतकऱ्यांने एका खात्यामध्ये यादीतील रकाना क्र. 10 मध्ये नमुद पेक्षा जास्त रक्कम भरु नये. (एकापेक्षा जास्त कर्जखाती असलेल्या शेतकऱ्याने त्याच्या हिश्श्याची रक्कम भरत असताना एक वेळ समझोता योजने प्रमाणे बँकेस देय असलेल्या रकमेपेक्षा जास्तची रक्कम त्या खात्यात भरु नये) शेतकऱ्यांनी योग्य ती माहिती घेऊन बँकेत रक्कम जमा करावी. बँकेच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना याबाबत मार्गदर्शन करावे.

बँकेमध्ये शेतकऱ्यांनी त्यांच्या हिश्श्याची रु.2 लाखावरील रक्कम संबंधीत बँकेत भरल्यानंतर संबंधीत बँकेने याबाबतची माहिती पोर्टलवर अद्ययावत करावी.

शेतकऱ्यांनी त्यांच्या कर्जाच्या रु. 2.00 लाखावरील कर्जाची रक्कम भरावयाची अंतिम मुदत दि. 31 मार्च 2027 पर्यंत राहिल. यादीत नमूद असलेल्या शेतकऱ्यांनी त्यांच्या हिश्श्याची रक्कम बँकेत भरणा केल्याची अद्ययावत माहिती दर शुक्रवारी बँकेमार्फत पोर्टलवर अपलोड केली जाईल. बँकेने माहिती पोर्टलवर अपलोड केल्याचे शेतकऱ्यास कळवायचे आहे. महा आयटी मार्फत अशा प्रकरणी शेतकऱ्यांनी त्यांच्या हिश्श्याची रक्कम यादी प्रमाणे भरणा केल्याची खात्रो पोर्टलवर करण्यात येईल. यादीत नमूद केलेली रु.2.00 लाखापेक्षा वरील रक्कम शेतकऱ्यांनी संबंधीत बँकेत भरली असल्यास अशा शेतकऱ्यांना थकबाकीचे अद्ययावतीकरण झाल्याच्या तीन दिवसानंतर संबंधित शेतकऱ्यासाठी आधार प्रमाणीकरण करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल.

योजनेच्या निकषानुसार अशा शेतकऱ्यांसाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी करणे आवश्यक असल्याने ज्या शेतक-यांनी ॲग्रीस्टॅक नोंदणी केलेली आहे अशा शेतकऱ्यांसाठीच आधार प्रमाणीकरणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल.

ज्या शेतकऱ्यांनी ॲग्रीस्टंक नोंदणी केलेली आहे व आधार प्रमाणीकरण केलेले आहे अशा शेतकऱ्यांना निकषांनुसार व संबंधीत बँकेत त्यांच्या हिश्श्याची भरलेली रक्कम भरल्यानंतर रु.2.00 लाखाचा लाभ हस्तांतरीत करण्यात येईल. शासनाने रु.2.00 लाखाची रक्कम वर्ग केल्यानंतर शेतकऱ्याची कर्जमुक्ती होणार आहे. सदरची एकवेळ समझोता योजना अंतर्गत यादी ही केवळ एकच यादी नसून बँकांकडे आलेल्या माहितीचे संगणकीय संस्करण करण्यात येईल व पात्र शेतकऱ्यांच्या याद्या यापुढेही प्रसिद्ध करण्यांत येतील. योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांमध्ये मयत झालेल्या तसेच वयस्कर व बोटांच्या उशाची नोंद होत नसल्याबाबत लाभार्थ्यांना कर्ज मुक्तीचा लाभ देण्याचे अनुषंगाने दि.19 ऑगस्ट 2026 रोजीची मानक कार्यप्रणाली निर्गमित करण्यात आलेली आहे, असे प्रसिद्धी पत्रकारद्वारे कळविण्यात आले आहे.

डिजिटल हयात प्रमाणपत्र तातडीने सादर करण्याचे आवाहन : तहसीलदार डॉ. शिवाजी मगर

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी: सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या विशेष सहाय्य योजनेंतर्गत लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांनी डिजिटल हयात प्रमाणपत्र तातडीने सादर करावे. लाभार्थ्यांनी हयात प्रमाणपत्र सादर न केल्यास भविष्यात संबंधित लाभार्थ्यांचे अनुदान शासन स्तरावरून बंद होण्याची शक्यता आहे. त्यामुळे लाभ सुरू ठेवण्यासाठी प्रमाणपत्र सादर करावे, असे आवाहन तहसीलदार डॉ. शिवाजी मगर यांनी केले आहे.

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना तसेच केंद्र पुरस्कृत इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना आणि इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजना राबविण्यात येतात. या योजनांमधील केंद्र पुरस्कृत लाभार्थ्यांचे हयात प्रमाणपत्र डिजिटल पद्धतीने सादर करण्यासाठी शासनाने 'बेनिफिशरी सत्यापन ॲप' विकसित केले आहे.

या ॲपच्या माध्यमातून आधार प्रमाणीकरण व फेस ऑथेंटिकेशन प्रक्रिया पूर्ण करून डिजिटल हयात प्रमाणपत्र ऑनलाइन तयार करता येते. तयार झालेले प्रमाणपत्र केंद्र शासनाच्या एनएसएपी पोर्टलवर थेट अद्ययावत होणार असल्याने लाभार्थ्यांना प्रमाणपत्र सादर करण्याची प्रक्रिया सुलभ, सुरक्षित व पारदर्शक होणार आहे. वारंवार नोटीस तसेच आवाहन करूनही अनेक लाभार्थ्यांनी अद्याप सादर केलेले नाही. हयात प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधित लाभार्थ्यांचे अनुदान शासन स्तरावरून बंद होऊ शकते. त्यामुळे लाभार्थ्यांनी ही प्रक्रिया वेळेत पूर्ण करून आपले अनुदान सुरू ठेवावे.

मोबाईलवरून असे तयार करा हयात प्रमाणपत्र

लाभार्थ्यांनी गुगल प्ले स्टोअरवरून 'आधार फेस आरडी ॲप' आणि 'बेनिफिशरी सत्यापन ॲप-2' हे दोन ॲप डाउनलोड करावेत. त्यानंतर 'बेनिफिशरी सत्यापन ॲप' सुरू करून भाषा निवडावी व डिव्हाईस रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण करावी. नोंदणीसाठी आधार क्रमांकासह मोबाईल क्रमांक किंवा ई-मेलवर प्राप्त होणाऱ्या ओटीपीच्या माध्यमातून प्रमाणीकरण करावे.

नोंदणी पूर्ण झाल्यानंतर मोबाईलच्या कॅमेऱ्याद्वारे फेस ऑथेंटिकेशन प्रक्रिया पूर्ण करावी. यासाठी चेहऱ्याची ओळख पडताळणी करताना ॲपच्या सूचनांनुसार डोळ्यांची हालचाल करून सेल्फी द्यावा. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर बेनिफिशरी व्हेरीफिकेशन सर्टीफिकेट अर्थात डिजिटल हयात प्रमाणपत्र ऑनलाइन प्राप्त होईल.

लाभार्थी ही प्रक्रिया स्वतःच्या मोबाईलवरून पूर्ण करू शकतात. तसेच सहकारी किंवा कुटुंबीयांच्या मदतीने, महा ई-सेवा केंद्र, तलाठी अथवा तहसील कार्यालयातील संजय गांधी विभागाच्या सहाय्याने डिजिटल हयात प्रमाणपत्र सादर करता येणार आहे. केंद्र पुरस्कृत वृद्धापकाळ, विधवा व दिव्यांग निवृत्तीवेतन योजनांच्या लाभार्थ्यांनी डिजिटल हयात प्रमाणपत्राची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून शासनाच्या अनुदान योजनांचा लाभ अखंडित सुरू ठेवावा, असे आवाहन तहसीलदार डॉ. शिवाजी मगर यांनी केले आहे.

परभणीत धावपटूंचा वेग, गोळाफेकीचा जोर अन् कबड्डीचा थरार

हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी



परभणी: मेरा युवा भारत, युवा कार्यक्रम आणि क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या वतीने दि. २० नोव्हेंबर २०२६ रोजी प्रियदर्शनी इंदिरा गांधी क्रीडा संकुल, परभणी येथे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. ग्रामीण भागातील युवकांच्या क्रीडागुणांना वाव मिळावा, त्यांच्यातील सुप्त क्रीडा कौशल्य विकसित व्हावे तसेच शारीरिक तंदुरुस्ती, खिलाडूवृत्ती आणि सांघिक भावना वाढीस लागावी, या उद्देशाने या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत १०० मीटर धावणे (मुले व मुली), गोळाफेक (मुले व मुली) आणि कबड्डी (मुले व मुली) अशा विविध क्रीडा प्रकारांचा समावेश होता. सर्व क्रीडा प्रकारांमध्ये युवक व युवतींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून आपले क्रीडा कौशल्य प्रदर्शित केले.

१०० मीटर धावण्याच्या मुलींच्या स्पर्धेत अनुजा अवचार यांनी प्रथम, पूजा इंगळे यांनी द्वितीय, तर मीरा काळदाते यांनी तृतीय क्रमांक पटकावला. मुलांच्या १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत आदित्य राऊत यांनी प्रथम, अथर्व गिते यांनी द्वितीय, तर स्वप्निल काकडे यांनी तृतीय क्रमांक मिळविला.

गोळाफेक मुलींच्या स्पर्धेत पूजा इंगळे यांनी प्रथम, प्रिती तांदळे यांनी द्वितीय, तर अस्मिता थोरवट यांनी तृतीय क्रमांक मिळविला. गोळाफेक मुलांच्या स्पर्धेत स्वप्निल काकडे यांनी प्रथम, आदित्य राऊत यांनी द्वितीय, तर वैभव कदम यांनी तृतीय क्रमांक पटकावला. मुलांच्या कबड्डी स्पर्धेत रन अकॅडमी संघाने प्रथम, तर एकलव्य अकॅडमी संघाने द्वितीय क्रमांक मिळविला. मुलींच्या कबड्डी स्पर्धेतही रन अकॅडमी संघाने प्रथम, तर एकलव्य अकॅडमी संघाने द्वितीय क्रमांक पटकावला.

या कार्यक्रमास जिल्हा युवा अधिकारी प्रणीत सांगवीकर, क्रीडा अधिकारी सुभाष नाटकर, क्रीडा मार्गदर्शक संजय मुंडे व प्रकाश पंडित तसेच सहायक कक्ष अधिकारी गजानन गाडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. स्पर्धेसाठी पंच म्हणून यमनाजी भाळशंकर, कैलास टेहरे, गोविंद काजळे, निलेश यादव, गजानन भालेराव, शेख कलीम, आदिनाथ सोळंके, योगेश भाळशंकर, अजय राठोड, सतीश कदम, बालाजी सलगर, वैभव तरंगे, अर्जुन भाळशंकर व अब्दुल खदिर यांनी काम पाहिले. विविध क्रीडा प्रकारांत सहभागी झालेल्या खेळाडूंनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपले क्रीडा कौशल्य दाखवून दिले. युवकांमध्ये क्रीडाविषयक आवड निर्माण करणे, त्यांना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन देणे आणि ग्रामीण भागातील खेळाडूंना आपली गुणवत्ता सिद्ध करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश होता.

परभणीच्या पथकाकडून जिंतूर येथील डीजे चोरीचा गुन्हा उघड; ₹80 हजारांचा मुद्देमाल जप्त.



हिंदु प्रकाश वार्ता/प्रतिनिधी

परभणी: पोलीस ठाणे जिंतूर येथे दाखल गु.र.नं. ५८१/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अंतर्गत डीजे चोरीचा गुन्हा उघड करण्यात आला आहे. या प्रकरणी दोन संशयितांना ताब्यात घेऊन चोरीस गेलेला डीजेचा मुद्देमाल व एक मोटारसायकल असा एकूण ₹८०,००० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

परभणी जिल्ह्यातील मालमत्तेविषयक गुन्ह्यांतील आरोपींचा शोध सुरू असताना गोपनीय बातमीदाराकडून मिळालेल्या माहितीनुसार पंकज परमेश्वर इंगळे (वय २२ वर्षे) आणि निखिल उर्फ भावड्या गोपीनाथ रोडे (वय २५ वर्षे), दोघे रा. सावंगी माळसा, ता. जिंतूर, यांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विचारपूसदरम्यान त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. दोघांना जप्त मुद्देमालासह पुढील तपासासाठी पोलीस ठाणे जिंतूर येथे हजर करण्यात आले आहे.

ही कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. पंकज कुमावत यांच्या आदेशानुसार, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. चिखले व पोलीस निरीक्षक श्री. गजेंद्र सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

कारवाईतील पथक : PSI गणेश सवंडकर, GPSI मधुकर चट्टे, ASI सुग्रीव केंद्रे, ASI निलेश भुजबळ, HC मुकेश बुधवंत, HC पांडुरंग तुपसुंदर, HC सुनील राठोड, HC नेताजी गीते, HC उत्तम हनवते आणि PC उमेश चव्हाण. यांच्या विशेष पथकाने अधिक परिश्रम घेत हे कामगिरी बजावली

दुष्काळी उपाययोजनांबाबत प्रशासन तत्पर

हिंदु प्रकाश वार्ता/ प्रतिनिधी

परभणी : ग्रामीण भागात निर्माण होणाऱ्या पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर नागरिकांसह जनावरांना पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाच्या निर्देशानुसार सेलू तालुक्यातील आठ गावांमधील विहिरी व बोअरवेल अधिग्रहित करण्यात आल्या आहेत. दुष्काळी भागात तत्परतेने पाणीटंचाई निवारणासाठी प्रशासनाने पाऊल उचलले असून, संबंधित गावांतील पाणीपुरवठा व्यवस्थेला आधार मिळणार असल्याचे तहसीलदार डॉ. शिवाजी मगर यांनी सांगितले आहे.

सेलू तालुक्यातील राव्हा, आहेर बोरगाव, तिडी पिंपळगाव, रायपूर, पार्टी कौसडी, कुंडी, तळतुंबा आणि डासाळा या आठ गावांमध्ये पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने विहीर व बोअरवेल अधिग्रहणाची कार्यवाही करण्यात आली आहे. यामध्ये राव्हा आणि रायपूर येथे विहिरी, तर उर्वरित गावांमध्ये बोअरवेल अधिग्रहित करण्यात आल्या आहेत.

अधिग्रहित करण्यात आलेल्या विहिरी व बोअरवेलमध्ये राव्हा येथील रामेश्वर कुंडलीकराव देवकते यांची विहीर, आहेर बोरगाव येथील शेख उमर शेख कठाळू यांची बोअरवेल, तिडी पिंपळगाव येथील दत्ता सोपानराव जोगदंड यांची बोअरवेल, रायपूर येथील अमोल बाबासाहेब गाडेकर यांची विहीर, पार्टी कौसडी येथील गणेश नरसिंग आढे यांची बोअरवेल, कुंडी येथील भागवत आन्सिराम मोगल यांची बोअरवेल, तळतुंबा येथील भगवान बाबुराव घुले यांची बोअरवेल आणि डासाळा येथील शेख इद्रीस शेख बडेमिया यांची बोअरवेल अधिग्रहित करण्यात आली आहे. या अधिग्रहणाच्या माध्यमातून संबंधित गावांतील पाणीटंचाईची तीव्रता कमी करण्यास मदत होणार असून, नागरिकांना तसेच जनावरांना गरजेनुसार पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असल्याचे तहसीलदार डॉ. शिवाजी मगर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

निवृत्तीवेतनधारकांसाठी (25 रोजी) विशेष कार्यशाळा व पेन्शन अदालत

छत्रपती संभाजीनगर, दि. 20 (जिमाका)- निवृत्तीवेतनधारक तसेच कुटुंब निवृत्तीवेतनधारकांच्या निवृत्तीवेतनविषयक अडचणींचे निराकरण करण्यासाठी बुधवार, दि. 25 नोव्हेंबर 2026 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे विशेष कार्यशाळा व पेन्शन अदालत आयोजित करण्यात आली आहे.

महालेखापाल, लेखा व हकदारी, नागपूर आणि वरिष्ठ कोषागार कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी 11 ते दुपारी 1.30 या वेळेत आयोजित कार्यशाळेत ई-पीपीओ (E-PPO), ओजीआरएस (OGRS), लाइव्ह केस स्टेटस ट्रॅकिंग तसेच पेन्शनर्स समाधान या नवीन उपक्रमांबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. या कार्यशाळेसाठी सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

मानस्तंभातील पार्श्वनाथ भगवंतांच्या मूर्तींचा अभिषेक; विश्वशांती होमहवनाने महामहोत्सवाची सांगता



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : श्री कलिकुंड पार्श्वनाथ सैतवाल दिगंबर जैन मंदिरात हजारो भाविकांच्या उपस्थितीत तीन दिवसीय महामहोत्सवाची भक्तिमय वातावरणात सांगता झाली. मानस्तंभात विराजमान पार्श्वनाथ भगवंतांच्या मूर्तींचा अभिषेक आणि विश्वशांती होमहवन हे सोहळ्याचे मुख्य आकर्षण ठरले.

मंगळवारी सकाळी भगवंतांची भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली. घोडेस्वार धर्मध्वज घेऊन अग्रभागी होते. पारंपरिक वेशभूषेतील कुमारिका व महिलांनी मंगल कलश धारण केले होते. युवकांनी पंचरंगी ध्वजांसह नृत्य, तर महिलांनी फुगडी व फेर धरून उत्साहात सहभाग घेतला.

आचार्य विनम्रसागर, आचार्य पवित्रसागर आणि आचार्य सुयशगुप्तजी महाराज यांच्या आशीर्वादाने मानस्तंभात पार्श्वनाथ भगवंतांच्या चार मूर्ती विराजमान करण्यात आल्या. याचा मान भारती प्रकाश भाकरे यांना मिळाला. तसेच सविता प्रवीण गोसावी, संगीताताई कैलास बाळशेटे व शिला आदिनाथ मोगले परिवाराला विविध धार्मिक विधींचा मान मिळाला. शिखर कलश स्थापनेचा बहुमान सुमंगलाताई भास्करराव अन्नदाते यांना मिळाला.

यावेळी आचार्य विनम्रसागर महाराज यांनी संतसेवा, आहारदान आणि परोपकाराचे महत्त्व सांगितले. सायंकाळी १०८ कलशांनी अभिषेक, कलशारोहण, छत्र, भामंडळ व चंवर स्थापना तसेच विश्वशांती होमहवन करण्यात आले. विश्वस्त मंडळ, महिला मंडळ आणि विविध संघटनांनी आयोजनासाठी परिश्रम घेतले.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी

पर्यावरण जनजागृतीसाठी राज्यभर फिरणार 5 विशेष रथ; एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन

पंढरपूर : पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना लहान वयातच समजावे, यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (MPCB) वतीने 5 विशेष पर्यावरण जनजागृती रथ तयार करण्यात आले आहेत. सौरऊर्जेवर चालणारे हे रथ आता संपूर्ण महाराष्ट्रात फिरून शाळकरी मुलांमध्ये पर्यावरण रक्षणाबाबत जनजागृती करणार आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पंढरपूर येथे या रथांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी 28 वर्षांपासून सुरू असलेल्या 'कार्तिकीची वारी, पंढरीच्या दारी' या पर्यावरणपूरक उपक्रमाचा समारोपही करण्यात आला.

AI आणि ॲनिमेशनच्या माध्यमातून पर्यावरणाचे धडे

या पर्यावरण रथांमध्ये आकर्षक मॅस्कॉट, ॲनिमेटेड व्हिडिओ, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि चॅटबॉटचा वापर करण्यात आला आहे. याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पर्यावरणाशी संबंधित माहिती मनोरंजक पद्धतीने दिली जाणार आहे. ओला आणि सुका कचरा वेगळा करणे, प्लास्टिकऐवजी कापडी पिशव्यांचा वापर, पाणी वाचवणे, वृक्षारोपण आणि विजेची बचत यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचाही या उपक्रमात सहभाग वाढवला जाणार आहे.

मुलांमधून पर्यावरण रक्षणाची चळवळ उभी राहील

हवामान बदल, जागतिक तापमानवाढ, दुष्काळ आणि अतिवृष्टी यांसारख्या संकटांवर मात करण्यासाठी पर्यावरण रक्षण ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. मुलांमध्ये लहान वयातच पर्यावरण संवर्धनाचे संस्कार रुजवले, तर ती मुले आपल्या कुटुंबालाही पर्यावरण रक्षणासाठी प्रेरित करतील. भविष्यात हीच मुले पर्यावरण चळवळीची खरी ब्रँड ॲम्बेसेडर ठरतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला. हा उपक्रम राबवल्याबद्दल त्यांनी MPCB अध्यक्ष सिद्धेश कदम आणि त्यांच्या टीमचे कौतुक केले.

'पर्यावरणाची वारी, पंढरपूरच्या दारी' या उपक्रमातून भारूड, पोवाडा आणि कीर्तनाच्या माध्यमातून पर्यावरणाचा संदेश दिला जातो. संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत एकनाथ महाराज यांच्या निसर्गविषयक विचारांचे महत्त्वही शिंदे यांनी यावेळी अधोरेखित केले.

वारीदरम्यान वारकऱ्यांसाठी स्वच्छ पाणी, स्वच्छतागृहे आणि मोबाईल टॉयलेटची व्यवस्था करण्यात आली आहे. 10 लाख पाण्याच्या बाटल्यांची व्यवस्था करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच 60 एकर परिसरात 10 हजार कार्पेट, कचरापेट्या आणि फुलझाडांच्या कुंड्यांची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती शिंदे यांनी दिली. स्वच्छतेसाठी स्वतंत्र मॉनिटरिंग यंत्रणाही कार्यरत आहे.

मोदींचा वैशाली दौरा! बिहारला मिळणार 34,470 कोटींच्या प्रकल्पांची मोठी भेट!

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या, शनिवार (२१ नोव्हेंबर) रोजी बिहारच्या महत्त्वपूर्ण दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्यात ते सर्वप्रथम वैशाली जिल्ह्यातील नव्याने उभारण्यात आलेल्या 'नितीश सेतू'ची पाहणी करतील. त्यानंतर वैशाली येथे होणाऱ्या मोठ्या कार्यक्रमात तब्बल ३४,४७० कोटी रुपये किमतीच्या विविध विकासकामांचे लोकार्पण, उद्घाटन आणि भूमिपूजन त्यांच्या हस्ते केले जाणार आहे. रस्ते, वीज, शहरी सुविधा, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य आणि सार्वजनिक वाहतूक अशा अनेक क्षेत्रांतील या योजनांमुळे बिहारमधील पायाभूत सुविधा अधिक भक्कम होतील आणि लोकांच्या दैनंदिन आयुष्यातील अनेक अडचणी दूर होऊन जीवनमान सुधारेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

गंगा नदीवरील 'नितीश सेतू'मुळे प्रवास होणार वेगवान

या संपूर्ण दौऱ्याचे सर्वात खास वैशिष्ट्य म्हणजे गंगा नदीवर बांधण्यात आलेला भव्य 'नितीश सेतू' हा केबल-स्टेड पूल, जो पंतप्रधान उद्या देशाला समर्पित करणार आहेत. सुमारे ४,२८० कोटी रुपये खर्चून साकारलेला हा १९.७ किलोमीटरचा प्रकल्प पाटणा जिल्ह्यातील कच्ची दर्गाह (NH-22) आणि वैशाली जिल्ह्यातील बिदुपूर (NH-322) यांना जोडतो. यामध्ये ९.७ किलोमीटरचा मुख्य पूल आणि १० किलोमीटरचे जोड रस्ते आहेत. या पुलामुळे जुन्या महात्मा गांधी सेतू आणि जेपी सेतूवरील वाहतुकीची कोंडी कमी होण्यास मोठी मदत होणार आहे, तसेच उत्तर आणि दक्षिण बिहारदरम्यानचा प्रवास खूपच कमी वेळेत पूर्ण होईल. विशेषतः राघोपूर दियारा परिसरातील नागरिकांना पाटणा शहराशी थेट जोडणी मिळाल्याने दवाखाने, शाळा आणि इतर मूलभूत सुविधा सहज मिळू शकतील. तसेच शेतीमाल आणि उद्योगांतील मालाची वाहतूक जलद होऊन राज्याच्या व्यापारात आणि अर्थव्यवस्थेत



मोठी वाढ होईल.

१५,६०० कोटींहून अधिक रकमेच्या कामांचे उद्घाटन

उद्याच्या कार्यक्रमात पंतप्रधान मोदींच्या हस्ते १५,६०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाची पूर्ण झालेली अनेक महत्त्वाची कामे सुरू केली जातील. यामध्ये राष्ट्रीय महामार्ग-१९ (औरंगाबाद-चोरदाहा) चे सहापदरीकरण, राष्ट्रीय महामार्ग-२२७ एफ (चोरमा-बैरगनिया) आणि राष्ट्रीय महामार्ग-३२७ (उमगाव-सहरसा) यांसारख्या मोठ्या महामार्गांचा समावेश आहे. वीज क्षेत्राचा विचार करता, १,३२० मेगावॅट क्षमतेच्या बक्सर औष्णिक विद्युत प्रकल्पाच्या युनिट-२ (६६० मेगावॅट) चे उद्घाटन होईल. यासोबतच वीज वितरण सुधारणा कामे (१,१३० कोटी रुपये), नवादा येथील फुलवरिया धरणावर उभारलेला तरंगता सौरऊर्जा प्रकल्प, कालव्यांची दुरुस्ती, कहलगाव येथील सांडपाणी प्रकल्प तसेच शाळा, रुग्णालये, क्रीडा आणि प्रशासकीय इमारतींचेही लोकार्पण केले जाईल.

१४,४५० कोटींच्या नवीन प्रकल्पांची पायाभरणी

भविष्यातील गरजा लक्षात घेऊन पंतप्रधान सुमारे १४,४५० कोटी रुपयांच्या नव्या प्रकल्पांची पायाभरणी करतील. यामध्ये ३,८०० कोटी रुपये खर्चून उभारण्यात येणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग-१३९ डब्ल्यू (साहेबगंज-अरेराज-बेतिया) च्या चौपदरीकरणाचा आणि पिरपैंती सुपर थर्मल पॉवर प्रकल्पाच्या (३,३५० कोटी रुपये) वीज वहन प्रकल्पाचा प्रामुख्याने समावेश आहे.

याच दौऱ्यात बेगुसराय, बिहारशरीफ, पूर्णिया, हाजीपूर, मोतिहारी, दानापूर, खगरिया, समस्तीपूर, बोधगया, सीतामढी आणि सहरसा या शहरांमध्ये पाणीपुरवठा आणि सांडपाणी वाहिन्यांच्या कामांचे भूमिपूजन केले जाईल. याशिवाय कालवा व्यवस्थेचे आधुनिकीकरण, डॉ. भीमराव आंबेडकर निवासी शाळा, आयआयटी पाटणा येथील रिसर्च पार्क व वसतिगृह, अभियांत्रिकी व पॉलिटेक्निक संस्था आणि पोलीस डेटा सेंटरच्या उभारणीलाही चालना मिळणार आहे.

१०० 'पीएम ई-बसेस' आणि २६,९०० कुटुंबांना मिळणार हक्काची घरे

शहरात स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त प्रवास उपलब्ध व्हावा यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी १०० नवीन 'पीएम ई-बसेस'ना हिरवा झेंडा दाखवतील. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेच्या (शहरी) माध्यमातून २६,९०० हून अधिक लाभार्थ्यांचा गृहप्रवेश सोहळाही पार पडणार असून, यामुळे शहरातील हजारो कुटुंबांचे स्वतःच्या घराचे स्वप्न पूर्ण होण्याच्या दिशेने मोठे पाऊल पडणार आहे.

वायनाडमध्ये खासदार संदिपान भुमरे यांच्याकडून कृषी सिंचन योजनेच्या कामांची पाहणी

पीक पद्धती, आधुनिक सिंचन तंत्रज्ञान आणि जलव्यवस्थापनाचा घेतला आढावा

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

वायनाड (केरळ) : संसदेच्या ग्रामीण विकास आणि पंचायती राजविषयक स्थायी समितीचे सदस्य तथा खासदार संदिपान भुमरे यांनी १८ नोव्हेंबर रोजी केरळमधील वायनाड जिल्ह्यातील देवयानी आणि चेरुकारा येथे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (PMKSY) अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध कृषी उपक्रमांची पाहणी केली. यावेळी त्यांनी योजनेच्या माध्यमातून विकसित करण्यात आलेल्या विविध पिकांची प्रत्यक्ष पाहणी करून आधुनिक शेती पद्धती, सिंचन सुविधा आणि कृषी विकासाच्या कामांची माहिती घेतली.



पाहणीदरम्यान विविध पिकांची लागवड, उत्पादन पद्धती, सिंचनासाठी उपलब्ध सुविधा तसेच पाण्याचा कार्यक्षम वापर यांचा आढावा घेण्यात आला. प्रत्येक शेतापर्यंत पाणी पोहोचविणे, सिंचनाखालील क्षेत्र वाढविणे आणि उपलब्ध जलसंपत्तीचा काटकसरीने वापर करणे, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या अनुषंगाने प्रत्यक्ष राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती भुमरे यांनी जाणून घेतली.

शेतीमध्ये ठिबक व तुषार सिंचनासारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास कमी पाण्यात अधिक उत्पादन घेणे शक्य होते. त्यामुळे जलव्यवस्थापनाच्या प्रभावी पद्धती आणि त्यांचा पीक उत्पादनावर होणारा परिणाम यांचाही त्यांनी अभ्यास केला.

मराठवाड्यासारख्या कमी पर्जन्यमान आणि वारंवार दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या प्रदेशासाठी अशा उपक्रमांचा अभ्यास महत्त्वाचा आहे. सिंचनाच्या शाश्वत सुविधा, पाण्याचा काटकसरीने वापर आणि आधुनिक पीक पद्धतींच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पादन व आर्थिक उत्पन्न वाढविण्यास मदत होऊ शकते, असे मत खासदार संदिपान भुमरे यांनी व्यक्त केले.

केंद्र शासनाच्या विविध योजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी जाणून घेणे, यशस्वी उपक्रमांचा अभ्यास करणे आणि ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी उपयुक्त उपाययोजना समजून घेणे, हा स्थायी समितीच्या या अभ्यास दौऱ्याचा उद्देश आहे.

दैठणा बसस्थानकावर येथे भीषण अपघात अपघातात एकाचा मृत्यू दोघे गंभीर जखमी

108 चे चालक अर्जुन कवळाचे यांची मोलाची भूमिका; गावकऱ्यांनी दाखवली तत्परता

हिंदू प्रकाश वार्ता/अशोक पवार

परभणी**परभणी तालुक्यातील दैठणा येथे बस स्थानकासमोर रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास उभे असलेल्या ट्रकला पाठीमागून दुचाकीची जोरदार धडक बसून भीषण अपघात झाला हे अपघातात चाकी वरील तिघांपैकी अमोल भीमराव दांडेकर वय 30 वर्ष यांचा जागीच मृत्यू झाला तर अन्य दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत

मिळालेली अधिक माहिती अशी की एम.एच .२० इजी ,90 20 या क्रमांकाचा ट्रक दैठणा बसस्थानकासमोर उभा होता याच दरम्यान एम एच 38 ए एन0915 या क्रमांकाची दुचाकीवरून तिघेजण जात असताना दुचाकीची ट्रकच्या पाठीमागील बाजूस जोरदार धडक बसली धडक इतकी भीषण होते की दुचाकीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले अपघातातील मृत अमोल भीमराव दांडेकर वय तीस वर्षे राहणार आमला जिल्हा हिंगोली येथील आहे तर जखमीमध्ये प्रणव वानखेडे वय 24 वर्ष राहणार चिखली तालुका रिसोड जिल्हा वाशिम आणि करण गजभारे वय 26 वर्ष राहणार हिंगोली यांचा समावेश आहे अपघात घडतात गावकऱ्यांनी घटनास्थळी गाव घेतली गावकऱ्यांनी 108 क्रमांक रुग्णवाहिकेचे चालक अर्जुन काळ कावळाशे यांना फोन करून माहिती दिली माहिती मिळताच त्यांनी क्षणाचाही विलंब न करता रुग्णवाहिका घटनास्थळी आणली तिघा जणांना रुग्णालयात हलवण्यासाठी 108 आणि सहारा रुग्णवाहिकेची मदत घेण्यात आली.

दोन गंभीर जखमींना 108 रुग्णवाहिकेतून तर मृत व्यक्तीला सहारा रुग्णवाहिकेतून हलवण्यात आले. गावकऱ्यांची तत्परता आणि अर्जुन कावळाशे यांचे वेळेवर मिळालेला सहकार्याचे मोलाचे ठरले घटनेची माहिती मिळतात पोलीस निरीक्षक निखिल पवार संदीप काळे तसेच गीते यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि वाहतूक सुरळीत करून अपघात ग्रस्त वाहनात संदर्भात पुढील कार्यवाही केली.

वडगाव-बजाजनगरच्या विकासासाठी चार कोटींचा निधी द्या!

जि.प. बांधकाम समिती सभापती सचिन गरड यांची ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे मागणी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : वडगाव कोल्हाटी, बजाजनगर तसेच गट नंबर परिसरातील वाढती लोकसंख्या आणि झपाट्याने होत असलेले नागरीकरण लक्षात घेता पायाभूत सुविधांच्या विकासासाठी चार कोटी रुपयांचा विशेष निधी मंजूर करावा, अशी मागणी जिल्हा परिषदेच्या अर्थ व बांधकाम समितीचे सभापती सचिन कल्याणराव गरड यांनी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात गरड यांनी मंत्री गोरे यांना लेखी निवेदन दिले. या निधीतून परिसरातील विविध रस्त्यांवर पेव्हर ब्लॉक बसविणे, चौकांचे सुशोभीकरण व नूतनीकरण करणे, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक परिसराचे



सुशोभीकरण आणि सभामंडप उभारणे, तसेच अंतर्गत रस्त्यांवर आधुनिक पथदिवे बसविण्याची कामे प्रस्तावित आहेत. वडगाव-बजाजनगर आणि गट नंबर परिसरात औद्योगिकीकरणामुळे लोकसंख्येत मोठी वाढ होत आहे. त्यामुळे सध्याच्या गरजांसोबतच भविष्यातील लोकसंख्या विचारात घेऊन रस्ते, प्रकाश व्यवस्था आणि इतर नागरी सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. नागरिकांना दर्जेदार सुविधा मिळाव्यात आणि परिसराचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी विशेष निधीची मागणी करण्यात आली आहे. यावेळी इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, जिल्हा परिषद अध्यक्ष अविनाश गलांडे पाटील, भाजप अल्पसंख्याक प्रदेशाध्यक्ष इंद्रिस मुलतानी, भाजप पश्चिम जिल्हाध्यक्ष संजय खंबायते, पूर्व जिल्हाध्यक्ष सुरेश बनकर, किशोर आबा पवार आणि छत्रपती संभाजीनगर पंचायत समितीचे सभापती कल्याण गायकवाड उपस्थित होते.

राज्यव्यवहार कोशातून फारसी, अरबी शब्दांना वगळले – प्रा. डॉ. केदार फाळके

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केल्यानंतर भाषाशुद्धीला विशेष महत्त्व दिले. राज्यकारभारात वापरल्या जाणाऱ्या फारसी आणि अरबी शब्दांऐवजी मराठी शब्दांचा वापर व्हावा, यासाठी त्यांनी राज्यव्यवहार कोश तयार करून घेतला. स्वभाषेला प्रतिष्ठा मिळवून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य शिवरायांनी केले, असे प्रतिपादन इतिहास संशोधक प्रा. डॉ. केदार फाळके यांनी केले.

साहित्य भारती आणि श्री शिवशंभू विचार मंच यांच्या वतीने दिवंगत इतिहासकार गजानन मेहेंदळे लिखित 'भारतातील इस्लामी राजवटींचे धार्मिक धोरण - उत्तरकालीन मुघल आणि औरंगजेब' तसेच प्रा. डॉ. केदार फाळके लिखित 'श्री शिवछत्रपती भारत भाग्यविधाता' या पुस्तकांचा प्रकाशन सोहळा मंगळवारी जीवन विकास ग्रंथालयात झाला. साहित्य



भारतीचे प्रांताध्यक्ष प्रा. डॉ. सर्जेराव जिगे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. व्यासपीठावर शिवरायांच्या विचारांचे अभ्यासक प्रा. डॉ. दिनेश कचकुरे आणि शिवशंभू मंचचे गोरक्षनाथ आबूज उपस्थित होते. लेखक बाबा भांड, प्रा. डॉ. उपेंद्र कुलकर्णी आणि डॉ. दिवाकर कुलकर्णी यांच्या हस्ते पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

प्रा. फाळके यांनी दोन्ही पुस्तकांच्या लेखनामागील भूमिका स्पष्ट करताना मुघल राजवटीतील धार्मिक धोरणांचा आढावा घेतला. जिझिया कर, धर्मांतर, मंदिरांचा विध्वंस आणि महिलांवरील अत्याचारांमुळे सामान्य जनतेत मुघल राजवटीविरोधात असंतोष निर्माण झाला होता. अनेकदा जनतेने या राजवटीविरोधात बंड केले. शिवरायांनी स्वराज्याची स्थापना केल्यानंतर अनेक महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. मंदिर आणि मठांना संरक्षण दिले. राज्यकारभारात परकीय भाषांतील शब्दांचा वापर कमी करून स्वभाषेला प्राधान्य दिले, असे त्यांनी सांगितले.

स्वराज्याच्या उभारणीत पर्यावरणाची भूमिका महत्त्वाची होती. मावळ्यांच्या सामर्थ्यावर शिवरायांनी स्वराज्य उभे केले. पर्यावरण हा स्वराज्याचा पाया होता. त्या काळात प्रसिद्ध होणाऱ्या लंडन गॅझेटमध्येही शिवरायांच्या कार्याची नोंद घेण्यात आली होती. यावरून शिवरायांचे कार्य जागतिक स्तरावर दखल घेण्यासारखे होते, असे मत प्रा. डॉ. दिनेश कचकुरे यांनी व्यक्त केले.

सरस्वती आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. गोरक्षनाथ आबूज यांनी प्रास्ताविक केले. विनायक पवार यांनी आभार मानले. दीपाली कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

साताऱ्यातील खंडोबा मंदिर पाडल्याचा दावा

औरंगजेबाच्या काळात अनेक मंदिरांची तोडफोड करण्यात आली. काशी, सोमनाथ, मथुरा, पंढरपूर आणि तुळजापूर येथील मंदिरांनाही लक्ष्य करण्यात आले. छत्रपती संभाजीनगरातील सातारा परिसरातील खंडोबा मंदिर १६५२ मध्ये पाडण्यात आले, तसेच १६४४ मध्ये लोणार सरोवर परिसरातील मंदिरांचेही नुकसान करण्यात आले, अशी माहिती प्रा. फाळके यांनी दिली.

देवगिरी बँकेला ग्राहकसेवेसाठी राष्ट्रीय पुरस्कार; 'एक्सलन्स इन कस्टमर सर्व्हिस' पुरस्काराने नवी दिल्लीत गौरव; अध्यक्ष किशोर शितोळे यांनी मानले ग्राहकांचे आभार

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : ग्राहकांना दर्जेदार सेवा, आधुनिक बँकिंग सुविधा आणि विश्वासार्ह व्यवहार उपलब्ध करून देण्यात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल देवगिरी नागरी सहकारी बँक लि.ला राष्ट्रीय स्तरावरील 'एक्सलन्स इन कस्टमर सर्व्हिस' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नवी दिल्ली येथे झालेल्या राष्ट्रीय सोहळ्यात बँकेला हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

नवी दिल्ली येथे १९ नोव्हेंबर रोजी 'इंडियन को-ऑपरेटिव्ह समिट अँड एक्सलन्स अवॉर्ड्स २०२६'चे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात भारतीय रिझर्व्ह बँकेचे संचालक सतीश मराठे यांच्या हस्ते, नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक्स अँड क्रेडिट सोसायटीजचे अध्यक्ष लक्ष्मी दास आणि



सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँकेचे माजी अध्यक्ष गौतम ठाकूर यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

बँकेच्या वतीने संचालक राजेश जैन, ॲड. सागर विद्वंस आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्ता शिंदे यांनी पुरस्कार स्वीकारला.

या पुरस्काराबद्दल बँकेचे अध्यक्ष किशोर शितोळे यांनी समाधान व्यक्त केले. ग्राहकांचा विश्वास आणि त्यांना दिली जाणारी उत्तम सेवा हेच बँकेच्या यशाचे प्रमुख आधार असल्याचे त्यांनी सांगितले. बदलत्या बँकिंग व्यवस्थेत ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, जलद सेवा आणि सुलभ व्यवहारांवर बँकेने भर दिला आहे. संचालक मंडळाचे मार्गदर्शन, अधिकारी-कर्मचाऱ्यांचे समर्पित योगदान आणि ग्राहकांचा विश्वास यामुळेच हा सन्मान मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.

'सहकार से समृद्धी – गव्हर्नन्स, डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन अँड एक्सलन्स' या संकल्पनेवर आधारित समिटमध्ये देशभरातील सहकारी बँका आणि सहकार क्षेत्रातील मान्यवर सहभागी झाले होते. देवगिरी बँकेला मिळालेला हा पुरस्कार ग्राहकसेवेतील तिच्या कार्याची राष्ट्रीय स्तरावर झालेली दखल असून, भविष्यातही अधिक दर्जेदार आणि विश्वासार्ह सेवा देण्यासाठी तो प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास शितोळे यांनी व्यक्त केला.

पीएम स्वनिधी योजनेत मनपाचा देशात तिसरा क्रमांक



हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर : प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (पीएम स्वनिधी) योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने राष्ट्रीय स्तरावर तिसरा क्रमांक पटकावला आहे. 'स्वनिधी सन्मान पुरस्कार २०२६' अंतर्गत मनपाला हा पुरस्कार मिळाला. दिल्ली येथे आयोजित समारंभात केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहारमंत्री मनोहरलाल खट्टर यांच्या हस्ते मनपा आयुक्त अमोल येडगे आणि उपायुक्त अपर्णा थेटे यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी एनयूएलएम विभागाचे भारत मोरे आणि सुरेंद्र पाटील उपस्थित होते.

कोरोना महामारीमुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या पथविक्रेत्यांना आर्थिक मदत करून त्यांचे व्यवसाय पुन्हा उभे करण्यासाठी केंद्र सरकारकडून ही योजना राबविण्यात येते. या योजनेंतर्गत छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने मार्च २०२६ पर्यंत ३२ हजार ५८२ पथविक्रेत्यांना पहिल्या कर्जाचा लाभ मिळवून दिला आहे. पहिल्या कर्ज वितरणाचे १०० टक्के उद्दिष्टही मनपाने पूर्ण केले आहे.

आयुक्त अमोल येडगे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त आयुक्त कल्पिता पिंपळे, उपायुक्त अपर्णा थेटे तसेच राष्ट्रीय नागरी उपजीविका अभियानातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या कामासाठी विशेष प्रयत्न केले. पथविक्रेत्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे आणि त्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी मनपाकडून पुढील काळातही प्रयत्न सुरू राहणार आहेत.

मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911